**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुगत ज्ञानदेव गायकवाड, : अपिलार्थी
भिमनगर, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. जी. मोरे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ३०-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात तहसीलदार, कळंब यांच्या साक्षीसाठी त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कळंब यांनी त्यांच्या दिनांक ३१-०१-२०१२ च्या पत्रान्वये तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०१२ असल्यामुळे सुनावणीसाठी हजर राहू शकत नसल्याने सुनावणीची तारीख बदलून मिळण्याची विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे व सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०६-०३-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुगत ज्ञानदेव गायकवाड, भिमनगर, कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, जिल्हा

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पैलवान उमेश प्रतापराव,<br>मु. पो. भवानी रोड, दिपक चौक, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जाधव शिवशंकर रामचंद्र, वरिष्ठ लिपिक, नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद<br>- श्री. खांडके व्ही. के. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०१-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ३०-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अपिलार्थी यांच्या माहितीच्या अर्जावरुन त्यांनी सन १९६० ते २००९ या कालावधीतील विविध मुद्दयावर जवळपास पन्नास वर्षाची माहिती मागितली आहे. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती द्यावी असा अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिलेला आहे. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांच्या साक्षीसाठी त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीचा माहितीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या प्रमाणावर जवळपास पन्नास वर्षाच्या कालावधीची विविध मुद्दयावर माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रात असलेली संपूर्ण माहिती दिनांक ४.२.२०१०, २७.४.२०१० रोजी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे. संस्थेकडची माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पैलवान उमेश प्रतापराव, मु. पो. भवानी रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजयकुमार मल्हारराव शेवाळे, : अपिलार्थी
रा.लोहारा,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क (दारुबंदी विभाग),
उमरगा,जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी,
राज्य उत्पादन शुल्क विभाग, उमरगा,जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |

या प्रकरणी यापूर्वी दि. ३०.१२.२०११ रोजी सुनावणी झाली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची तारीख दि. ०१.०२.२०१२ अशी निश्‍चित करण्यात आली होती. आज देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास समजू शकत नाही. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन मुद्देनिहाय निर्णय घ्यावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,राज्य उत्पादन शुल्क विभाग, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार मल्हारराव शेवाळे, बसवेश्वर चौक, मेन रोड, लोहारा, ता.लोहारा,जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क (दारुबंदी विभाग), उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, : अपिलार्थी
जिल्हाध्यक्ष, माहिती सेवा समिती, श्री मोठा मारोती, देशमुख गल्ली, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी, :
पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी,<br>जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. मोरे आर. ए.,<br>क. स. पंचायत समिती, पाथरी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०६-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २१-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता या प्रकरणात आयोग उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना जन अपिलीय अधिकारी निश्चित करीत आहे. त्यांनी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, जिल्हाध्यक्ष, माहिती सेवा समिती, श्री मोठा मारोती, देशमुख गल्ली, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. महादप्पा शिवलिंग बोधने,<br>प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई - ०१ | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई - ०१ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महादप्पा शिवलिंग बोधने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई - ०१ - श्री. ए. बी. बागडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई - ०१ - श्री. बी. एन. डावरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०४-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१-०६-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १४-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण १७ मुद्दयावर विस्तृत अशी माहिती संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०६-२०११ रोजी माहिती पाठविलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली व त्यांचा निर्णय दिनांक ०५-११-२०११ रोजी दिला आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, संचालनालयाचे पत्र दिनांक ०१-०६-२०११, दिनांक ०७-०६-२०११ व दिनांक ०५-०८-२०११ अन्वये माहिती देऊनही अपिलार्थीचे समाधान झाले नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्यासाठी त्यांचा दिनांक १४-०७-२०११ च्या अपिलीय अर्जाच्या अनुषंगाने सुनावणीची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी संचालनालयात दिनांक १७-०८-२०११ रोजी दुपारी ०२-३० वाजता उपस्थित राहण्याविषयी कळविण्यात आले होते. परंतु अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे त्यांना पुन्हा एक संधी दिनांक ३०-१२-२०११ रोजी देण्यात आली. तेव्हाही अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांची बरीच व्दितीय अपिले आयोगासमोर सुनावणीस येतात. त्यामध्ये आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थी प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहत नाहीत व त्यांची बाजू मांडत नाहीत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावयाची झाल्यास अपिलार्थी यांनी प्रथम अपिलावरील सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक ठरत आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा

संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ०१ यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेऊन निर्णय पारित करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ०१ यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०७-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महादप्पा शिवलिंग बोधने, प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, मुंबई - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निसार अहेमद इनामदार, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य/मुख्याध्यापक,
डॉ. जाकिर हुसेन ज्युनिअर कॉलेज व हायस्कूल,
परभणी

जन अपिलीय अधिकारी, :
डॉ. जाकिर हुसेन ज्युनिअर कॉलेज व हायस्कूल,
परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निसार अहेमद इनामदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०८.२०११ (फेरसादर दि.०८.११.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३१.०१.२०११ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ सहशिक्षक श्री. शेख हजी अकबर पिता शेख महेबूब यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.त्यांना मुद्दा क्र. ३ व ७ वगळून बाकी सर्व माहिती मिळाली आहे. मुद्दा क्र. ३ मध्ये त्यांनी संबंधित त्रयस्थ सहशिक्षकांस नेमणूक देण्याचे वेळी शासननियमाप्रमाणे वृत्तपत्रात जाहीरात दिली असल्यास त्या वृत्तपत्राची सत्यप्रत मागितली आहे, त्याचप्रमाणे मुद्दा क्र. ७ मध्ये संबंधित त्रयस्थ सहशिक्षकाच्या नेमणूकीच्या वेळी शासन आदेशाप्रमाणे उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांची लेखी परीक्षा घेतली असल्यास त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. ही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांना वरील मुद्दा क्र. ३ व ७ ची माहिती मिळालेली नाही. वृत्तपत्राच्या संदर्भित जाहिरातीची सत्यप्रत देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल अथवा अशी जाहीरात प्रसिध्दीस दिली नसल्यास तसे स्पष्टपणे कळवावे लागेल. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. ७ द्वारे मागितलेली माहिती अधिनियमातील कलम 8(1)(e) व (j) तरतुदीनुसार नमूद केलेल्या कसोटीवर उतरत नाही, म्हणून देय होणार नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/ मुख्याध्यापक, डॉ. जाकिर हुसैन ज्युनिअर कॉलेज व हायस्कूल, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित जाहीरातीची सत्यप्रत हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निसार अहेमद इनामदार, रा.ललीत कलाभवनासमोर, काद्राबाद प्लॉट, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक,डॉ. जाकिर हुसैन ज्युनिअर कॉलेज व हायस्कूल,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,डॉ. जाकिर हुसेन ज्युनिअर कॉलेज व हायस्कूल,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीधर माणिकराव गोवर्धन, : अपिलार्थी
रा.पुर्णा (जं.), जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षण उपसंचालक,
विभागीय कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
महापालिका मार्ग,मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद- श्री. माधव जुमडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०९.२००८ (फेरसादर,दि.०१.०६.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती. सदरची माहिती लेखाधिकारी (शिक्षण),परभणी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने त्यांच्याकडे अपिलार्थी यांचा अर्ज दि. ०६.०६.२००८ रोजी पाठविला. तदनंतर अपिलार्थीस माहिती मिळाली आहे किंवा कसे यासंदर्भात त्यांना माहिती नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

वरील बाबी विचारात घेता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीधर माणिकराव गोवर्धन, मु.पो.ता.पूर्णा (जं.), जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक,विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राधाकिशन प्रसादराव कदम, : अपिलार्थी
संपादक, सा. जनतेची साक्ष कार्यालय, नूतन रोड, सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ब्रम्हंवाकडी, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिति, सेलू,
जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राधाकिशन प्रसादराव कदम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ब्रम्हंवाकडी, तालुका सेलू, जिल्हा परभणी - श्री. सोळंके डी. ए. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिति, सेलू, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - सौ. पडकुते जे. एस., का. अ. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०२-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-११-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत ब्रम्हंवाकडी, तालुका सेलू, जिल्हा परभणी कडील विविध पंधरा मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता एका महिन्याच्या आत माहिती देणे शक्य झाले नाही ही बाब आयोगास योग्य वाटते. तथापि अपिलार्थी यांना खालील दोन मुद्दयावर अपूर्ण माहिती मिळाली आहे व ती माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक एकच्या संदर्भात सरपंच यांनी शासनाने आरक्षित केलेल्या चार गुंठे जागेवर अतिक्रमण करून शौचालय बांधले आहे याबाबतच्या मंजुरीच्या प्रती.

२. मुद्दा क्रमांक आठच्या संदर्भात त्रयस्थ श्री. प्रदीप नानासाहेब कदम यांनी शौचालय बांधलेले आहे किंवा कसे याबाबतच्या कागदपत्राच्या प्रती. तसे कागदपत्रे नसल्यास नेमकी परिस्थिती अपिलार्थीस कळवावी.

वरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस एक महिन्याच्या आत देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राधाकिशन प्रसादराव कदम, संपादक, सा. जनतेची साक्ष कार्यालय, नूतन रोड, सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, ब्रम्हंवाकडी, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती वंदना सदाशिव बायस,<br>रा.इंदेवाडी, पो. पोकर्णी (नृ),ता.जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपअधिक्षक,<br>परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधिक्षक, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती वंदना सदाशिव बायस | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०८.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.११.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०२.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे ते कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तामुळे सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे नमूद करुन पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. ०६.०३.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक 01-02-2012**

**दिनांक ०१-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती वंदना सदासिव बायस, मु.इंदेवाडी, पो. पोकर्णी(नृ), ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रत्नाकर त्रिंबकराव कहात, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत, धर्मापुरी, ता.जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रत्नाकर त्रिंबकराव कहात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक,ग्रामपंचायत, धर्मापुरी, ता.जि.परभणी - श्री. टेकाळे आर.बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी,पंचायत समिती, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.आर.चिलगर, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.११.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांनी दि. २६.०८.२०११ रोजी सुनावणी घेतली व निर्णय दिला की, दि. ३०.०८.२०११ पर्यंत माहिती देण्यात यावी, त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी माहिती दिलेली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. त्यांना खालील माहितीची आवश्यकता आहे.

१) ग्रामपंचायत ठरावाची प्रत त्यांना मिळाली, तथापि त्यावर ठरावाचा क्रमांक व दिनांक याबाबतचा तपशील नाही. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे दि. २६.०६.२०११ रोजी झालेल्या ग्रामसभेच्या तपशीलासह त्यांना माहिती देण्यात यावी.

२) ग्रामपंचायतीने फेरफार केलेल्या (वाटणी व वारसाहक्काने झालेली प्रकरणे वगळून) मालमत्तांसंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या नकला मागितल्या आहेत. त्यामध्ये त्यांना फेरफाराच्या प्रती मिळाल्या आहेत. तथापि नागरिकांनी केलेल्या त्यासंदर्भातील अर्जाच्या प्रती मिळाल्या नाहीत.

ही माहिती सन २००८ ते २०११ या कालावधीची आहे, असे जवळजवळ १००-१५० फेरफार असतील, असा त्यांचा अंदाज आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या माहितीच्या प्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल व मुद्दा क्र. २ म्हणजे अर्जाच्या प्रती संकलीत करुन एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ संदर्भातील माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी. त्याचप्रमाणे मुद्दा क्र.२ संदर्भातील माहितीसाठी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रत्नाकर त्रिंबकराव कहात,अण्णासाहेब गव्हाणे रोड(नवामोंढा रोड),परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, धर्मापुरी, ता.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश ईरन्ना चौधरी, : अपिलार्थी
गाडीपुरा, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
आस्थापना विभाग, मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७६६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश ईरन्ना चौधरी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली<br>- श्री. मव्हानकर डी. व्ही. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली<br>- डॉ. प्रदीप ठेंगल | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-११-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-०६-२०११ च्या माहिती अर्जान्वये मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांच्याकडे नगर परिषद हिंगोलीमधील सफाई कामावर असलेल्या महिला व पुरुष यांच्याबाबत विविध अकरा मुद्दयांवर माहिती मागितली आहे. या माहितीपैकी काही माहिती १९८०-८१ या सालापासूनची विचारलेली आहे तर काही मुद्दयांवर एप्रिल २००० ते जून २०११ अशी दहा वर्षाची विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थी हे व्यक्तिशः माहिती घेणार होते.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची त्यांना पाहणी देण्यात आली आहे व आवश्यक माहितीच्या प्रती दिनांक २०-०८-२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आल्या आहेत त्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना ही माहिती मिळाली नाही असे नमूद केले. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून संबंधितास ताकीद देण्यात येत आहे असे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील दिनांक २२-०८-२०११ च्या निर्णयामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या अर्जावरुन असे दिसून येत आहे की, त्यांनी मागितलेल्या एकूण अकरा मुद्दयावरील माहितीपैकी ब-याच मुद्दयावरील माहिती ही लेखी स्वरुपात मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये दिलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येत अशा प्रकारची माहिती बसत नाही म्हणून लेखी स्वरुपात माहिती देणे किंवा स्पष्टीकरणात्मक स्वरुपात माहिती देणे अपेक्षित नाही. त्याचप्रमाणे माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती देणे आवश्यक आहे. माहिती संस्करण करुन देय होत नाही याची नोंद सर्वांनी घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पाठविली आहे तथापि अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नाही असा युक्तिवाद केला असल्यामुळे यापूर्वी पाठविलेला माहितीच्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीचा एक संच अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्यात यावा. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश ईरन्ना चौधरी, गाडीपुरा, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली.
२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर-श्री. एस.सी.मनपिया | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.११.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे. तथापि मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहितीची संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकली नाही, म्हणून देता आली नाही. तसेच मुद्दा क्र. ४,५,६,७ च्या संदर्भातील माहिती इंग्रजी भाषेमध्ये देण्यात आली आहे. ती अपिलार्थीस मराठीमध्ये अपेक्षित आहे.

या बाबी विचारात घेता मुद्दा क्र.४,५,६,व ७ च्या संदर्भातील मराठी भाषेतील प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील, मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील अभिलेखांचा शोध घेण्याकरिता कार्यालय प्रमुख या नात्याने जन अपिलीय अधिकारी यांनी कसोशीने संचिकेचा शोध घ्यावा व या संदर्भातील निष्कर्ष अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावेत. त्याचप्रमाणे ही माहिती उपलब्ध न झाल्यास ती इतरत्र असल्यास त्या कार्यालयाचा पत्ता कळविण्यात यावा, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क,नागपूर यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप पंढरीनाथ टेहरे, रा.अरुण ऑटो स्टोअर्स,गांधी पार्क,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,जिल्हाधिकारी कार्यालय

परिसर,सिव्हील लाईन, नागपूर -४४०००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,सिव्हील लाईन, नागपूर -४४०००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी,<br>रा.सेलू, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी,सेलू, जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपविभागीय अधिकारी,सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.व्ही.वांबुरकर, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -अतिरिक्त जिल्हाधिकारी,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी.पी.वाकोडकर,अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०९.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४.११.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००८ ते २०११ या कालावधीतील जिंतूर, सेलू,पाथरी,मानवत या तालुक्यातील तलाठयांच्या बदल्याबाबतची विविध माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०७.२०११ रोजी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांनी सुनावणी घेऊन दि. १९.०९.२०११ रोजी निर्णय दिला आहे. अपिलार्थी या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी उपस्थित होते, असे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना मुद्दा क्र. २ व ३ या दोन मुद्यांवरील माहिती वगळता इतर माहिती देण्यात आली आहे. ही माहिती सात दिवसाच्या आत अपिलार्थीस देण्यात यावी. यासंदर्भात आयोगाचे असे निदेश आहेत की, तलाठयांचा सजानिहाय तपशील व ज्या दिनांकापासून कार्यरत आहेत त्या नोंदीसह माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावी.असे एकूण ८० तलाठी चार तालुक्यांमध्ये असतील, असे सुनावणीच्यावेळी आयोगासमोर कथन करण्यात आले. शासन निर्णय व परिपत्रकांच्या प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. इतर कार्यालयातून ही माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, जि. परभणी

तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

३.३ तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. वाय. झोंड : उपस्थित

३.४ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,

तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

३.५ जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. ए. : उपस्थित

जायभाये, विस्तार अधिकारी (पंचायत)

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहितीच्या व्याप्तीचा व कालावधीचा विचार न करता दहा दिवसात माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे. तसेच अपिलार्थी यांनी नोंदणीकृत टपालाने पाठविलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी स्विकृत केली नाही. 'घेण्यास नकार' या पोस्टाच्या शे-यासह अपिलार्थीस त्यांनी पाठविलेले टपाल परत आले आहे असे सकृतदर्शनी दिसून येत असल्यामुळे या प्रकरणात संपूर्ण चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीची पाहणी जन माहिती अधिकारी ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद देतील याची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी व्यक्तिशः खातरजमा करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन देतील व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करतील याची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी व्यक्तिशः खातरजमा करावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांनी नोंदणीकृत टपालाने पाठविलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी स्विकृत केली नाही, घेण्यास नकार दिला तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीची व्याप्ती व कालावधी विचारात घेतला नाही व मुद्देनिहाय निर्णय पारित केलेला नाही या बाबी विचारात घेऊन प्रकरणात संपूर्ण चौकशी करावी. अशी शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंकुश माधवराव बडक, मु. पो. पळशी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,

तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मीकांत मनोहर कापसीकर,<br>यश इंजिनिअर्स, लक्ष्मी निवास, ७३, जयविश्वभारती कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००५ | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मीकांत मनोहर कापसीकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. बाकलीवार म. अ. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. विवेक मो. पांडे, वरिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-१०-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०१-२०११ (अमरावती कार्यालयाकडे प्राप्त) दि. ०१-०२-२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १२-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्दयावर यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या अनुषंगाने चालू असलेल्या कामांची माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (झ) अन्वये नाकारण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांच्याकडे अशाच प्रकारची माहिती मागितली असता ती त्यांना देण्यात आली आहे. आज रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता आयोगास दिलेल्या अधिकारानुसार त्यांची विशेष साक्ष ठेवण्यात येत आहे व प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १३-०३-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत मनोहर कापसीकर, यश इंजिनिअर्स, लक्ष्मी निवास, ७३ जयविश्वभारती कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उमेश किर्तीकुमार रुपारेल, : अपिलार्थी

अे/०९, एवरहेल्दी दवाखान्याच्या वर,नाथनगर, सिंधी कॉलनीच्या मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ०१

जन अपिलीय अधिकारी तथा :

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ०१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उमेश किर्तीकुमार रुपारेल | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ०१ - श्री. दलालधन श्रीराम कुकडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ०१ - श्री. किशोर पुंजो नारखेडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०२-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले व कागदपत्रे सादर केली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २७-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये संपूर्ण राज्यातील शासन अनुदानित संस्थेतील (पदवी व पदविका) शिक्षकांची माहिती मागितली आहे. यामध्ये संस्था सुरु झाल्याचे वर्ष, संस्थेस अनुदान मिळाल्याचे वर्ष, शिक्षकाचे नांव, शिक्षण गुणवत्ता / अर्हता, सेवेत ज्या पदावर रुजू झाले ते पद अशी विविध बाबीवर एकूण बारा मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरच्या माहिती अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद देणे आवश्यक होते, तथापि तसे केल्याचे दिसून येत नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२०११ रोजी राज्यातील ५३ अनुदानित पदवी व पदविका संस्थेच्या प्राचार्याना अपिलार्थीस माहिती देण्याबात कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी तक्त्यात माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची तक्त्यात माहिती त्यांच्या कार्यालयात ठेवण्यात येते किंवा कसे ही बाब तपासणे आवश्यक होते कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येनुसार माहितीचे संस्करण करुन देणे अभिप्रेत नाही. प्रत्येक पदवी व पदविका संस्थेकरिता स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज करण्याबाबत अपिलार्थीस कळविणे आवश्यक होते तथापि ही बाब त्यांनी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना भविष्यात दक्ष राहण्याकरिता समज देण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी तक्त्यामध्ये माहिती मागितली आहे. माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ती देय होते. ती तक्त्यामध्ये तयार करुन देणे अभिप्रेत नाही. माहिती अर्जावर सत्वर माहिती पुरविण्याच्या दृष्टीने प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे जन माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज अशा माहिती अधिका-याकडे करणे आवश्यक आहे ही बाब त्यांनी केलेली दिसत नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारे ५३ कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज करणे जरुरी आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या तक्त्यामध्ये माहिती ठेवण्यात येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमेश किर्तीकुमार रुपारेल, अे/०९, एवरहेल्दी दवाखान्याच्या वर,नाथनगर, सिंधी कॉलनीच्या मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीराम आप्पाराव पडुळ, : अपिलार्थी
विशेष कार्यकारी अधिकारी, मु. पो. लाडसावंगी,
तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२८४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी त्यांच्या दिनांक ०८-११-२०११ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्यानुसार अपिलार्थी दिनांक १९-११-२०१० व दिनांक २४-११-२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले. त्यावेळी त्यांना दोन मुद्दयांची माहिती देण्यात आली. बाकी मुद्दयांची माहिती देण्यात आली नाही. ही बाब विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची उपलब्ध संचिका माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संचिका त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीराम आप्पाराव पडुळ, विशेष कार्यकारी अधिकारी, मु. पो. लाडसावंगी, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुनिल भानुदास पिसे,<br>शिवप्रसाद झेरॉक्स, प्लॉट नं. २१९, इंडियन बँकेच्या समोर,<br>समर्थनगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी<br>कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - श्री. वाणी एम. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद - श्री. बालाजी क्षीरसागर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०२-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तयार ठेवण्यात आली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते, तथापि त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दिलेल्या पत्त्यावर खास दुतामार्फत माहिती पाठविली होती तथापि त्या पत्त्यावर ते राहत नाहीत असे त्यांना ज्ञात झाले आहे. याबाबतची नोंद त्यांच्या दप्तरी दाखल आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचे नमूद केले आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल भानुदास पिसे, शिवप्रसाद झेरॉक्स, प्लॉट नं. २१९, इंडियन बँकेच्या समोर, समर्थनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गंगाधर तुकाराम जाधव,रा. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
भोकरदन, जि.जालना : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय,जालना :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गंगाधर तुकाराम जाधव | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या दि. १०.११.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, जालना यांनी, अपिलार्थी यांनी विहित नमुन्यात अपील दाखल केले नाही व शपथपत्र सादर केले नाही, म्हणून दि. १०.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, जालना यांनी मुद्देनिहाय निर्णय घेणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली असल्यास अधिनियमातील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच कलम ८मधील तरतुदी विचारात घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून नोंदवून घेऊन सुनावणी घेऊन यथोचित निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. १०.११.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ८ व ११ मधील तरतुदी विचारात घेऊन, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधर तुकाराम जाधव, एन ११ इ १८/०६ मयुरनगर,हडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,पोलीस अधिक्षक कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.सैय्यद इसाक सैय्यद गुलाब, : अपिलार्थी
रा.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहसंचालक,
उच्च शिक्षण,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहसंचालक,
उच्च शिक्षण,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कनिष्ठ प्रशासन अधिकारी, कार्यालय सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद- श्री. व्ही.जी.बल्लाळ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहसंचालक,उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद -डॉ. मोहम्मद फय्याज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.१२.२०१० |

(फेरसादर दि.०३.०२.२०११)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे शिवाजी महाविद्यालय,कन्नड, जि.औरंगाबाद येथील नियतकालीक छपाईबाबत दि. ०१.०४.२००५ ते ३१.०३.२०१० या कालावधीतील माहिती मागितली आहे. सदरची माहिती शिवाजी महाविद्यालयाशी संबंधित असल्यामुळे संबंधित महाविद्यालयाकडून माहिती मागवून घेण्यात आली. शिवाजी महाविद्यालय,कन्नड यांनी दि. ११.१०.२०१० रोजी माहिती दिली आहे व तदनंतर दि. १६.१०.२०१० रोजी अपिलार्थीस माहितीची एकूण २२२ पृष्ठे विनामूल्य देण्यात आली आहेत. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः स्वीकारली आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी दिलेली पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सैय्यद इसाक सैय्यद गुलाब, संपादक -आपला नवा माणूस, देशमुख मंजिल, करिमनगर,कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, कार्यालय सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक,उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री.शेख शौकत अली शेख हिदायत अली,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.शेख शौकत अली शेख हिदायत अली | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून,अन्नधान्य वितरण कार्यालय,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद- श्री. राहुल गायकवाड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०८.२०१० ते १५.०८.२०१० या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या आदेशाने स्वस्तधान्य दुकाने, केरोसिन हॉकर्स, किरकोळ विक्री परवानाधारकांची चौकशी केली गेली, त्या सर्व परवानाधारकांचे फॉर्मस्च्या छायांप्रती -अशी माहिती मागितली आहे.या कालावधीमध्ये एकूण ३३ स्वस्तधान्य दुकानांची तपासणी झाली असून त्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.आयोगाच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थीस त्यांच्या दु.क्र.१४ संदर्भातील माहिती हवी आहे. आज रोजी देण्यात आलेल्या माहितीमध्ये स्व.धा.दु.क्र.१४ संदर्भातील माहितीचा समावेश नाही.

या सर्व बाबी पाहता, स्वस्त धान्य दुकान क्र.१४ च्या संदर्भातील तपासणी केलेल्या कागदपत्रांची व त्यासंदर्भात दिलेल्या आदेशाच्या प्रती अशी माहिती अपिलार्थीस देय होत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या स्वस्त धान्य दुकान क्र.१४ च्या संदर्भातील तपासणी केलेल्या कागदपत्रांच्या व त्यासंदर्भात दिलेल्या आदेशाच्या छायांकित प्रती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख शौकत अली शेख हिदायत अली, रा.कैसर कॉलनी, गल्ली नं.४, नॅशनल मंडपसमोर,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन,अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.अजमतुला खान अब्दुल रहीम,रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अधिक्षक,
भूमी अभिलेख, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उप अधिक्षक,भूमी अभिलेख, जालना- श्री.आर. बी.वाघमोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,जालना यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,जालना यांनी अपिलार्थीच्या दि. १५.११.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजमतुला खान अब्दुल रहीम, घर क्र.४६ सी-शहानगर,बीड बायपास,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.मो. ताजोद्दीन पिता सईदुद्दीन सिद्दीकी,रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय,बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा नियोजन अधिकारी,बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. जाधव एस.एन., संशोधन सहायक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी,बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,बीड यांनी अपिलार्थीच्या दि. २४.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ताजोद्दीन सईदुद्दीन सिद्दीकी, बाबर कॉलनी, छोटू किराणा स्टोअर्सच्या बाजूला, कटकट गेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.गायकवाड रमेश लक्ष्मण,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी,औरंगाबाद (प्रादेशिक) | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक वनसंक्षक,<br>वन विभाग,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वनपरिक्षेत्र अधिकारी, औरंगाबाद - श्री. आर.एस.दसरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक वनसंरक्षक, वनविभाग,औरंगाबाद - श्री. आर.पी.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये वनक्षेत्रपाल श्री. जी. एम.शिंदे यांनी कार्यालयामध्ये पदभार स्वीकारल्यापासून दि. १८.११.२०१० पर्यंतची सुमारे तीन वर्षांची माहिती ५ मुद्यांद्वारे मागितली आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामध्ये - या कालावधीमध्ये दिलेल्या धनादेशाचा तपशील, विविध योजनांच्या कामांची माहिती, रोख लेखा, हजेरीपत्रक,फॉर्म नं.३२,वाहतुक पासबुक इ.-या मुद्यांचा समावेश आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. माहिती विखुरलेली असल्यामुळे संकलीत करण्यासाठी काही कालावधी लागला. अपिलार्थी यांनी दि.२०.१२.२०१० रोजी प्रथम अपील सादर केले त्यावर दि. १८.०१.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी याबाबतची नोंद घेण्यात आली व अपिलार्थीस १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अपिलार्थीस दि. ०४.०२.२०११ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार आहे घेऊन जावी, असे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी दि. १४.०२.२०११ रोजी माहिती (सुमारे ९०० पृष्ठे) व्यक्तिशः घेतलेली आहे. त्यासंदर्भातील पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. तसेच अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. ०४.०२.२०११ रोजीचे असून अपिलार्थीस दि. १४.०२.२०११ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एका महिन्याच्या आत देता येणे शक्य नव्हते, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोगास पुरेसा वाटतो.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड रमेश लक्ष्मणराव, मु.पो.इंदिरानगर,बायजीपुरा,गल्ली नं.२१,औरंगाबाद

२.	जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनविभाग,औरंगाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्दार्थ रामराव पवार, श्री.प्रशांत केशवराव म्हस्के, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद,औरंगाबाद- श्री. टी.बी.गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली असल्यास अधिनियमातील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच कलम ८मधील तरतुदी विचारात घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून नोंदवून घेऊन सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय यथोचित निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २९.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ८ व ११ मधील तरतुदी विचारात घेऊन, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ रामराव पवार,श्री.प्रशांत केशवराव म्हस्के, प्लॉट नं. २६, संगीता कॉलनी, भावसिंगपूरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.राजेंद्र एस.बनकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्राथमिक आरोग्य केंद्र,
वरुड (काजी),औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधिकारी, वरुड काझी, ता.जि.औरंगाबाद - डॉ. टी.डी.भानुशाली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद - डॉ. प्रमोद एस.माने | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०५.०२.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय उपस्थित अधिकारी आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये प्राथमिक आरोग्य केंद्र, वरुड (काझी) ता.जि.औरंगाबाद संदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. सदरची माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे अपिलार्थीस पाहणीकरिता उपलब्ध करुन ठेवण्यात आली होती. त्यासंदर्भात अपिलार्थीस दूरध्वनीवरुन व दि. १५.१०.२०१० रोजीच्या पत्राने माहिती घेण्याचे कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. याचसंदर्भात दि. १२.१२.२०१० रोजीच्या स्मरणपत्राने कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती, त्यासंदर्भात दि. २१.१२.२०१० रोजी कळविले होते. त्याचप्रमाणे त्यानंतर दि. ११.०१.२०११ रोजी सुनावणी ठेवली होती. दोनही सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे तदनंतर "वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, वरुड काझी यांनी ॲड.बनकर यांनी दि. ०५.१०.२०१० च्या माहिती अधिकार अर्जान्वये मागितलेली माहिती तयार असून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यालयात येऊन घेऊन जावी असे रजिस्टर्ड पोस्टाने ॲड.बनकर यांना कळवावे व ॲड. बनकर यांना हवी असणारी माहिती ते कार्यालयात आल्यावर उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थी यांनी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः जाऊन दि. ०५.१०.२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलली माहिती उपलब्ध करुन घ्यावी", असा निर्णय घेऊन अपील निकाली काढले. त्यानंतर दि. १९.०१.२०११ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली. त्यामध्ये एकूण २७४ (६१+११९+८७+७) पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्याबाबतची पोच दिली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. नेमके नमूद केलेले नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. राजेंद्र एस.बनकर, वैशालीनगर, एन-८, सिडको, अनिकेत हॉस्पीटल समोर, घर नं. ८/२१/७३१,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, वरुड काजी, ता.जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भगवान दामोधर गायकवाड,श्री. प्रशांत केशवराव म्हस्के,रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद,औरंगाबाद :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. टी.बी.गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली असल्यास अधिनियमातील कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच कलम ८ मधील तरतुदी विचारात घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून नोंदवून घेऊन सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय यथोचित निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २९.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ८ व ११ मधील तरतुदी विचारात घेऊन, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवान दामोधर गायकवाड,श्री. प्रशांत केशवराव म्हस्के,प्लॉट नं. २६, संगीता कॉलनी,भावसिंगपूरा रोड,औरंगाबाद - ४३१ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.चंद्रकांत रंगनाथ काळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगररचना विभाग,<br>महानगरपालिका,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक,<br>नगररचना विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.चंद्रकांत रंगनाथ काळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता (नगररचना), महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. अविनाश भास्करराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. डी.पी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०१.२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७.०२.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी आयोगास सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती केली. त्यानुसार आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १४.०३.२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य गुरुनगर,सिडको, एन-८,एफ-४,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (नगररचना), महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, परभणी : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३५९

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद
- श्री. सरवदे आर. सी.

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद
- श्री. खालिद बी. अरब

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०५-०७-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. १८-०९-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-१२-२०१०
(मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)
दि. ०५-१२-२०११
(औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त)

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २१-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थी यांच्या दिनांक १८-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीकरिता उपस्थित राहणेकरिता पत्र क्रमांक जा. क्र. २०११/रामाआ/प्रथम अपील/सीआर/२८/३८३, दिनांक १४-०१-२०११ अन्वये अपिलार्थीस कळविण्यात आले होते. तथापि सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय व अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलामध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेता सदरचे व्दितीय निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल, निशांत, वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,<br>५-११-२०, रामदेवनगर, पदमपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १,<br>औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद तथा मुद्रांक<br>जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १,<br>औरंगाबाद - श्री. एम. एल. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद तथा मुद्रांक<br>जिल्हाधिकारी, औरंगाबाद - श्री. आर. बी. मुळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. २५-०३-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २८-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित काही कागदपत्रे सोबत आणली होती . ती कागदपत्रे अपिलार्थीस देण्यात आली व ती कागदपत्रे मूळ माहिती अर्जाप्रमाणे आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी अपिलार्थीस संधी देण्याकरिता प्रकरणात त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

मागील सुनावणीच्या वेळी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित उर्वरीत कागदपत्रे प्रमाणित करुन द्यावयाची होती. सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या प्रमाणित प्रती बरोबर आणलेल्या आहेत. आयोगाच्या आदेशानुसार त्या अपिलार्थीस देण्यात आल्या. अपिलार्थी यांनी त्या स्विकारल्या. अपिलार्थी यांनी याची पाहणी करावी व अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, ५-११-२०, रामदेवनगर, पदमपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महाजन सुरेश विठ्ठलसिंग, : अपिलार्थी

रा. जवाहर कॉलनी, म्हाडा जवळ, हिवरखेडा रोड, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग,नाशिक

जन अपिलीय अधिकारी तथा :

विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/५२६

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग,नाशिक - श्री. जितेंद्र रमेश वळवी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

उपायुक्त तथा सदस्य, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक - श्री. मोहन बुबला शेल्टे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१-१०-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-१२-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०१-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ३०-०६-२००९ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. त्यावेळी आयोगाने अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घ्यावा याकरिता अपील त्यांच्याकडे परत पाठविले होते. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक १३-०१-२०२० रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर दिनांक १०-०५-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्यावेळी सुध्दा अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यावेळी आयोगास अवगत केले होते की, त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले आहे व अभिलेखे व्यवस्थित लावण्याचे काम चालू आहे, त्यामुळे मूळ संचिका प्राप्त करुन घेऊन प्रस्तुत प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास सादर करण्यासाठी वेळ देण्यात यावा. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती १५-१६ वर्षापूर्वीची असून अपिलार्थी पाच त्रयस्थांची माहिती मागत आहे. ही माहिती त्यांच्या अभिलेख कक्षात शोध घेऊनही सापडत नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली तथापि प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध होत नाही व सन १९९७-९८ ते २०१०-११ या कार्यकाळातील राजपूत भामटा जातीच्या नस्तीसंबंधी विस्तृत स्वरुपाची माहिती असल्याने कार्यालयात येऊन माहिती पाहण्याबाबत दिनांक १३-०९-२०११ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. परंतु अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. सदरच्या माहितीचे रेकॉर्ड लावण्याचे काम चालू आहे. माहिती उपलब्ध झाल्यास माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची सद्यस्थिती कळवावी. तसेच संचिकेचा शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यावर अपिलार्थीस माहिती द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महाजन सुरेश विठ्ठलसिंग, रा. जवाहर कॉलनी, म्हाडा जवळ, हिवरखेडा रोड, कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त तथा सदस्य, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भास्कर गंभीरराव चव्हाण, : अपिलार्थी
व्दारका, प्लॉट नं. ५, समतानगर, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अजिंठा,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/५३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भास्कर गंभीरराव चव्हाण | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अजिंठा,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी -डॉ. चव्हाण के. आर. | : उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- डॉ. पी. एस. माने | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०८-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०-०९-२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-१०-२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४-११-२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०१-२००८ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०८-०६-२००७ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, त्यांचे वकील, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून एम. एल. सी. केसेसमध्ये किती दिवसामध्ये माहिती पुरविणे बंधनकारक आहे याबाबतचे शासनाचे आदेश, परिपत्रक इत्यादी पुढील सुनावणीस सादर करावे व सह संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची साक्ष घेणे आयोगास आवश्यक आहे असा निर्णय घेऊन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना उपरोक्त माहिती प्राप्त झाली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, एम. एल. सी. प्रकरणामध्ये तात्काळ अहवाल पोलिसांना पुरविणे आवश्यक आहे. तथापि याबाबत शासनाचे आदेश, परिपत्रक इत्यादी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

सदरची बाब अपिलार्थीस लेखी कळविण्यात यावी. या पार्श्वभूमीवर सदरचे प्रकरण सर्वानुमते बंद करण्याचे ठरले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर गंभीरराव चव्हाण, व्दारका, प्लॉट नं. ५, समतानगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अजिंठा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनंत व्यंकटेश राजुरकर,<br>मातृप्रेम, विद्यानगर,<br>परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. मगर एस. पी., लिपिक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १४-१२-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०३-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २९-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सोनपेठ, जिल्हा परभणी यांनी दिलेली नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती देण्यात यावी, असा निर्णय घेतल्यानंतरही माहिती देण्यात आली नाही. याची कारणमिमांसा आयोगास होणे आवश्यक असल्याने सुनावणी पुढे ढकण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती दिनांक २०-०९-२०११ रोजी म्हणजे आयोगापुढे झालेल्या सुनावणीनंतर देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते अनुपस्थित आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत व्यंकटेश राजुरकर, मातृप्रेम, विद्यानगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास विष्णुदास मोरे,<br>मु. पो. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पी. जी. पोटफोडे, अ. का., तहसील कार्यालय, पालम | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-०२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १४-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, परभणी यांनी तहसीलदार, पालम यांना उद्देशून लिहिलेल्या व आयोगास पृष्ठांकीत केलेल्या दिनांक १९-०१-२०१२ च्या पत्रान्वये प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १४-०३-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास विष्णुदास मोरे, मु. पो. गुगळीधामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार,<br>व्दारा, अरुण देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी - श्री. श्री. अ. मुधळवाडकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. आर. शेळके | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. जे. गाजरे, व. स. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-१०-२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०१-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १७-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०-०१-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १४-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी दिनांक १३-०६-२०११ रोजीच्या पत्राव्दारे प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्याची आयोगास विनंती केली होती. त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे (एकूण पृष्ठे ४७) सोबत आणलेली आहे. ती आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देण्यात आली. त्यांनी ती स्विकारली. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी व अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार, व्दारा, अरुण देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन माणिकराव देशमुख, : अपिलार्थी
व्दारा, ॲड झरीकर, नारायण चाळ, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८८० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. डी. बी.चिद्रेवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी - श्री. जी. एस. खाडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-११-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १७-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मौजे कारेगांव तालुका जिल्हा परभणी सर्वे नंबर २२/१, गट नंबर ८३ मधील रस्त्याबाबत दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. ही बाब अपिलार्थीस दिनांक २७-०५-२०११ रोजी कळविण्यात आली आहे व दिनांक १३-०१-२०११ रोजी उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, कार्यालय, परभणी यांना त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्याच्या नोंदीवरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याकरिता कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दिनांक २७-०१-२०११ रोजी अपिलार्थीस सदरची माहिती उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, कार्यालय, परभणी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असेही कळविले आहे.

आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसत आहेत. तथापि भविष्यात माहितीचे अर्ज संबंधिताकडे विहित मुदतीत पाठविण्याची दक्षता जन माहिती अधिकारी यांना घ्यावी लागेल. असे आयोग सूचित करीत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन माणिकराव देशमुख, व्दारा, ॲड झरीकर, नारायण चाळ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वामन रंगनाथराव मोरे,<br>संपादक, साप्तहिक-सत्यम् शिवम् सुंदरम्,<br>बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/८८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>परभणी - श्री. के. ए. देशमुख | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पी. पी.<br>वाकोडकर, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०७-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०९-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २१-०६-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये जून २००९ ते मे २०१० या कालावधीची एकूण चौदा मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला व मागितलेली माहितीपैकी जशा स्थितीत माहिती उपलब्ध आहे ती देण्याकरिता रुपये ७० /- इतक्या शुल्काचा ३५ पृष्ठासाठी भरणा करण्याचे कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी दिनांक ०१-०६-२०१० रोजी रुपये ७० चा भरणा केल्यानंतर एकंदर ३५ पृष्ठांची माहिती दिनांक ०७-०६-२०१० च्या पत्राने देण्यात आली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार असल्याने त्यांनी ती प्रत्यक्ष स्विकारली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी दिनांक २६-०७-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचेशी संपर्क साधून त्यांना आवश्यक असलेली मुद्देसूद स्वरुपाची माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२०१० रोजी अपिलार्थीशी संपर्क साधला होता. त्याची पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती जशा स्थितीत उपलब्ध आहे तशा स्थितीत अपिलार्थीस देण्यात आली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या माहिती या संज्ञेमध्ये माहिती संस्करण करुन देणे अभिप्रेत नाही. माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती देय होते. या पार्श्वभूमीवर या टप्प्यावर सदरचे व्दितीय अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, संपादक, साप्तहिक-सत्यम् शिवम् सुंदरम्, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिशीर कवडुजी घोनमोडे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, चंद्रपूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, चंद्रपूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिशीर कवडुजी घोनमोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक वर्ग-२,प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर - श्री. पी.एम.वझलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, चंद्रपूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५.१२.२००९

(नागपूर कार्यालयाकडे प्राप्त)

दि. १९.०१.२०१०

(औ.बाद कार्यालयाकडे प्राप्त)

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०६.०७.२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्याने आयोगातर्फे प्रकरणात सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

मागील दि. ०६.०७.२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित माहिती - राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा तपशील सोबत आणलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या सूचनेनंतर अपिलार्थीस हस्तांतरित केला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिशीर कवडूजी घोनमोडे, द्वारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सहकारशक्ती इमारत, शामनगर, अंबाजोगाई रोड, लातूर-४१३ ५३१

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वर्ग-२, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महेश सुर्यकांत ढवळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर अभियंता,
नगर परिषद, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नगर अभियंता,महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. देशमुख एन.एम.,शाखा अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपायुक्त, महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.०४.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०६.२००८, ०१.०२.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०२.२०१० |

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०७.०७.२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख देण्याचा आयोगातर्फे निर्णय घेण्यात आला होता. त्याप्रमाणे आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि. १६.०६.२००८ रोजी खासदुतामार्फत पाठविण्यात आली होती. आयोगाच्या आदेशानुसार प्रथम अपिलावर दि. ३०.०१.२०१० व ०१.०२.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात येऊन अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती. या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते.त्यापूर्वी दि.१२.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी मुद्दा क्र.१ ते १० मुद्यांवर सुनावणी घेण्यात आली व यापैकी मुद्दा क्र. ४ संदर्भात बिलाची प्रत द्यावी, असे अपिलार्थी यांनी त्यांचे म्हणणे मांडले होते. तदनंतर प्रथम अपिलाच्या दुसऱ्या टप्प्यातील दि. ०१.०२.२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या मुद्दा क्र.११ व ३३ संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाद्वारे अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी आयोगासमोरील मागील सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते. आज रोजीही अनुपस्थित आहेत.

या सर्व बाबी पाहता अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. महेश सुर्यकांत ढवळे, हिरास कॉम्प्लेक्स, कापड लाईन, वॉरियर ग्रुप संपर्क कार्यालय, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.पुंडलिक वैजनाथ चाटे, : अपिलार्थी
रा.चापोली, ता.चाकूर,
जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्राचार्य, संजीवनी महाविद्यालय,चापोली,
ता.चाकूर, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय शिक्षण उपसंचालक,
लातूर विभाग,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य, संजीवनी महाविद्यालय,चापोली, ता.चाकूर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर - श्री. शिशीर घोनमोडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.११.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३.०२.२०१०

या प्रकरणाची यापूर्वी दि. ०७.०७.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार प्रकरणात आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे तथापि अपूर्ण माहिती दिली आहे, असे मोघमपणे नमूद केल्याचे दिसून येत आहे. याकरिता त्यांना कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे,ते त्यांना पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता.चाकूर, जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. पुंडलिक वैजनाथ चाटे, रा.मु.पो.चापोली, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, संजीवनी महाविद्यालय,चापोली, ता.चाकूर,

जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.जनगावे राजशेखर मन्मथअप्पा,<br>रा.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर - श्री. शिशीर घोनमोडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |

या प्रकरणाची यापूर्वी दि. ०७.०७.२०११ रोजी सुनावणी झाली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व मुख्याध्यापक, ज्ञानसागर विद्यालय, हासेगाव, ता.औसा, जि.लातूर हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील क्र.७,८,९ व १० या मुद्यांशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे उपलब्ध आहे. सदरची माहिती शिक्षणाधिकारी (मा.),जि.प.लातूर यांनी यापूर्वी दिली नसल्यास अपिलार्थीस द्यावी लागेल. उर्वरित माहिती संबंधित मुख्याध्यापक,ज्ञानसागर विद्यालय, हासेगाव,ता.औसा, जि.लातूर यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे दि. २१.०८.२००९ रोजी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला असल्याचे दिसून येत आहे.

शिक्षणाधिकारी (मा.)जिल्हा परिषद, लातूर यांच्या दि. ०९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती संबंधित मुख्याध्यापक, ज्ञानसागर विद्यालय, हासेगाव,ता.औसा, जि.लातूर यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी पाहता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

२) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जि.प.लातूर यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत वर नमूद केल्याप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ज्ञानसागर विद्यालय, हासेगाव,ता.औसा, जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.जनगावे राजशेखर मन्मथअप्पा, द्वारा कमळे किराणा स्टोअर्स, झिंगनप्पा गल्ली, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ज्ञानसागर विद्यालय, हासेगाव,ता.औसा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महंमद अब्दुल रजाक अ.रहीमान, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहकार अधिकारी श्रेणी-१,संलग्न सहा.निबंधक सहकारी संस्था,लातूर - श्री. एस.एस.माळी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक (प्रशासन), सह.संस्था,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०१० |

या प्रकरणाची यापूर्वी दि. ०७.०७.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी आयोगासमोर प्रकरणाशी संबंधित सद्यस्थिती सादर करु शकले नाहीत. त्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २५.०२.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र.२ संदर्भातील माहिती अपिलार्थीस दि. १२.१०.२००९ रोजी दिली आहे. मुद्दा क्र.१ संदर्भात - संबंधित युगंधर पुरुषोत्तम सहकारी गृहनिर्माण संस्था म.,अर्वी, ता.लातूर या संस्थेने त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार दि. ०७.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे.

प्रसंगावशात अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित कालावधीमध्ये अपिलार्थी हे संस्थेचे सचिव या नात्याने कार्यरत होते, असे आयोगासमोर कथन करण्यात आले.

या सर्व बाबी पाहता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा व माहिती उपलब्ध झाल्यास जन माहिती अधिकारी सदर माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील अन्यथा माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे कळवतील, असे पहावे. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था,लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कार्यवाही पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महंमद अब्दुल रजाक अ.रहीमान, माजी सचिव युगंधर गृह निर्माण सोसायटी, म.अर्वी, रा.लेबर कॉलनी, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१,संलग्न सहा.निबंधक सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सह.संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.बळीराम सोपान नागरगोजे, : अपिलार्थी
रा.रामवाडी, पो. महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी,अहमदपूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वन परिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर - श्री. आर.जी.मुद्दमवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आर.एम.जोशी, लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०७.२०११ रोजी झाली होती. अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे जोडलेली नव्हती. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आज रोजी प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांच्याकडे अपिलार्थी यांचा विचाराधीन माहितीचा अर्ज प्राप्त झाला नाही.त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील प्राप्त झाले नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १५.०३.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे जोडलेली दिसून येत नाहीत. आज अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास त्यांची बाजू समजू शकत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागरगोजे बळीराम सोपान, रा.रामवाडी, पो.महाळंगी, ता.चाकूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.दत्तात्रय गोरोबा कोळी,<br>रा.निलंगा, जि.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपअधिक्षक (मु.),<br>पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधिक्षक,<br>पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.दत्तात्रय गोरोबा कोळी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -पोलीस उपअधिक्षक (मु.),<br>पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधिक्षक,<br>पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस.आर.<br>गोसावी, सहायक पोलीस निरीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन तसेच जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,लातूर यांनी घेतलेल्या प्रथम अपिलावरील निर्णयावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या दोन मुद्यांसंदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.१५.०६.२०१० रोजी निर्गमित केलेल्या निर्णयामध्ये नमूद केले आहे की, अर्जदारास मुद्दा क्र. १ व २ बाबत आवश्यक माहिती मिळाली असल्याचे त्यांना स्पष्ट करुन सांगण्यात आले आहे व ते सुनावणी दरम्यान त्यांनी मान्य सुध्दा केलेले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने माहिती मिळालीच नाही असा आयोगासमोर युक्तिवाद केला.

या सर्व बाबी विचारात घेता यापूर्वी पाठविलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना पुन्हा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु.), लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी, तेरणा प्रकल्प वसाहत, निलंगा, ता.निलंगा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मु.),पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तुर,
ता.लोहारा,जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/९४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मुख्याध्यापक,श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तुर, ता.लोहारा,जि.उस्मानाबाद - श्री. चव्हाण के.एल. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.डी.चव्हाण, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७.०३.२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०८.०७.२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी देखील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तुर, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १४.०९.२००९ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे त्यांच्या वैयक्तिक सेवापुस्तिकेविषयी सन १९५८ ते १९६१ या कालावधी काही मुद्यांवर माहिती मागितली आहे. या अर्जाच्या अनुषंगाने दि. २५.०९.२००९ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे.त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी बऱ्याच मुद्यांवर प्रश्नार्थक माहिती मागितलेली आहे. ज्या मुद्यांवर प्रश्नार्थक माहिती मागितली आहे, त्या प्रश्नाच्या मागील पार्श्वभूमी लक्षात घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. अपिलार्थी यांचे मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांना जी माहिती आवश्यक आहे ती देण्यात यावी, असा दि. ०६.०४.२०१० रोजी निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि. १५.०४.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस माहिती पाठविण्यात आली आहे.

प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी एकाच वर्षात एकूण दहा अर्ज त्यांच्याकडे सादर केले असून ते सातत्याने माहितीची मागणी करत असतात.

या सर्व बाबी विचारात घेता अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द बसवणप्पा हविले, 'साधना', लक्ष्मी कॉलनी, जुना औसा रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री शांतेश्वर विद्यालय, सास्तुर, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेरखाँ साहेबखाँ पठाण, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (संगानियो),
तहसील कार्यालय,परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१०६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २९.०६.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (सं.गां.नि.यो.), तहसीलदार

कार्यालय, परभणी उपस्थित होते. त्यांनी आयोगास कथन केले होते की, ते या पदावर नुकतेच रुजू झाले आहेत व प्रकरणाची वस्तुस्थिती सादर करण्यासाठी पुढील सुनावणीची तारीख देण्याची आयोगास विनंती केल्यामुळे आयोगातर्फे पुढील सुनावणी आज दि.०३.०२.२०१२ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. १६.०३.२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेरखॉ साहेबखॉ पठाण, क्रांतीनगर,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगानियो),तहसील कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,उपविभागीय अधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विकास रामचंद्र शिंदे, सारा वैभव रो.क्र.डी/३,जटवाडा रोड, हर्सूल परिसर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक नगर रचना शाखा कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२५३ | | |
| २ | प्रथम सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | दिनांक ०१-०४-२०११ च्या सुनावणीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक नगर रचना शाखा कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद श्री. अनिल यादवराव वघळे | : | उपस्थित |
| ४ | द्वितीय सुनावणीची तारीख | | दि. २८-०६-२०११ |
| ५ | दिनांक २८-०६-२०११ च्या सुनावणीची उपस्थिती | | |
| ५.१ | अपिलार्थी | | अनुपस्थित |
| ५.२ | जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक नगर रचना शाखा कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ५.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना,<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ६ | तृतीय सुनावणाची तारीख | दि. ०३-०२-२०१२ |
| ७ | आज रोजीची उपस्थिती | |
| ७.१ | मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव<br>रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना | उपस्थित |
| ८ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-११-२००९ |
| ९ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | दि. ०२-१२-२००९ |
| १० | अंतरीम आदेशाची तारीख | दि. २८-०६-२०११ |
| ११ | अपील सुनावणीची तारीख | दि. ०३-०२-२०१२ |

२) या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद उपस्थित होते. मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी श्री.विकास रामचंद्र शिंदेअनुपस्थित होते.

३) जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली होती.

३.१) मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांनी दि. २२.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री.विकास रामचंद्र शिंदे यांच्यासंदर्भात एकूण ६ विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. वि.रा.शिंदे यांना दि. ८.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. वि.रा.शिंदे यांनी दि. १४.१०.२००९ च्या पत्रान्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. १६.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. ०७.११.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. २७.११.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांचा दि.

२२.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ६ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व उक्त माहिती देण्याने त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री. वि.रा.शिंदे यांनी प्रस्तुत द्वितीय अपील आयोगापुढे केले आहे. त्रयस्थ श्री. वि.रा.शिंदे या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

३.२) त्रयस्थ श्री.वि.रा.शिंदे यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला आहे. सदर लेखी युक्तिवादात असे प्रतिपादन केलेले आहे की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये.

४) प्रकरणात निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत असल्याने प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात आली. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांना श्री. वि.रा.शिंदे यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता. भोकरदन, जि. जालना यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल. या निष्कर्षाप्रत आयोग आल्यानंतर खालील अंतरीम आदेश देण्यात आले " सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा."

५) आज दिनांक ०३-०२-२०१२ रोजी सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. गजानन देशमुख उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, स्वातंत्र्य सैनिकांच्या रक्ताच्या नात्यातील एका पाल्यास शासन सेवेमध्ये शासन निर्णयानुसार सामावून घेता येते. रक्ताच्या नात्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांची मुले, सख्खा भाऊ, बहिणीची मुले इत्यादीचा शासन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे समावेश होतो. ब-याच प्रकरणामध्ये अशा नात्याबाहेरील व्यक्तींना शासन सेवेत सामावून घेतले आहे व याकरिता त्यांना सदरची माहिती आवश्यक आहे. कारण यामध्ये व्यापक जनहित आहे. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, खालील गोष्टीवरुन

स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यास नियमानुसार नोकरी दिली आहे किंवा कसे हे सिध्द होऊ शकते व म्हणून त्यांच्या मूळ माहिती अर्जामधील फक्त खालील माहिती त्यांना देण्यात यावी.

१. स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानपत्राची व शपथपत्राची प्रत (मुद्दा क्र.४),

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियुक्तीपूर्वी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत (मुद्दा क्र.५),

अपिलार्थी यांनी त्यांची बाजू मांडल्यानंतर निर्णयासाठी प्रकरण राखून ठेवण्यात आले.

६) आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे तसेच आयोगापुढे दिनांक ०१-०४-२०११ रोजी करण्यात आलेला युक्तिवाद या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता खालील प्रश्न उपस्थित होतात.

६.१) अपिलकर्त्याने त्रयस्थाची मागितलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे किवा कसे

या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. अपिलार्थी यांनी एकूण सहा मुद्दयांवर माहिती मागितली आहे व ही माहिती शासकीय दप्तरी दाखल असली तरी त्रयस्थाच्या संदर्भात आहे. त्यापैकी किती माहिती कलम ८ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत आहे हे पाहणे आवश्यक ठरत आहे.

६.२) त्रयस्थ हे शासकीय कर्मचारी आहेत त्यामुळे ते कलम ११ खाली त्रयस्थ होतात किंवा कसे.

वकिलांनी दिलेल्या लेखी युक्तिवादानुसार अर्जदाराने त्रयस्थांची नावानिशी माहिती मागितली असल्याकारणाने ते सरकारी कर्मचारी असले तरी त्रयस्थ होतात व कलम ११ खाली त्यांची बाजू ऐकून घेणे जरुरीचे आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थांची बाजू मांडण्याची संधी दिली आहे.

६.३) अर्जदारांनी मागितलेल्या माहितीपैकी कोणती माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झाली आहे व कोणती माहिती वैयक्तीक स्वरुपात निर्माण झाली आहे.

माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींचा विचार केल्यास मूळ अपिलार्थीने मागितलेली ही माहिती शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे किंवा शासकीय कार्यालयातर्फे निर्माण झालेली आहे किंवा शासनाशी केलेल्या पत्रव्यवहारामध्ये निर्माण झाली आहे त्यामुळे ती सर्व माहिती स्वाभाविकत:च सार्वजनिक स्वरुपाची बनते. अर्जदाराने वर नमूद केलेल्या सहा मुद्दयांमधील मुद्दा क्रमांक १ , ३, ४, ५ ही माहिती सार्वजनिक कामकाजामध्ये निर्माण झालेली आहे. मुद्दा क्रमांक १ व ३ मधील काही माहिती तसेच मुद्दा क्रमांक २ व ६ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची आहे. या सर्व सहा मुद्दयावरील माहिती त्रयस्थांशी संबंधित (Related) असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदीच्या अधिन राहून माहिती जाहीर (Disclose) करण्याचा निर्णय घेणे आवश्यक ठरत आहे.

६.४. व्यापक जनहिताबद्दलचे निकष.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(७) व कलम ११ नुसार माहिती जर त्रयस्थाबाबत असेल (related to third party) तेव्हा त्यांची बाजू ऐकूण घेणे आवश्यक आहे

व त्यानंतर कलम ८ मधील विविध तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देणे जनहिताच्या कसोटीवर उतरते का, ही बाब पाहणे आवश्यक आहे.

अर्जदाराने त्रयस्थांची मागितलेली मुद्दा क्रमांक १ व ३ (काही माहिती) तसेच २ आणि ६ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने व कलम ८ (१) (ञ) नुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्याने त्यांना ही माहिती देय होणार नाही तथाापि मुद्दा क्रमांक १, ३(काही माहिती) व ४, ५ बाबत व्यापक जनहिताचे निकष लागू होत असल्याने ही माहिती देय होते असे आयोगाचे मत आहे. सेवा पुस्तकाच्या प्रथम पानावर नमूद असलेल्या वैयक्तीक गोष्टी जसे जन्म खुणा, मूळ वास्तव्याचा पुरावा, टी. सी. इत्यादी बाबतची माहिती कलम ८ (१) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे देय होत नाही, परंतु उर्वरित माहिती ही जनहितामध्ये येत असल्याने ही माहिती कलम १० नुसार देय होत आहे.

६.५. त्रयस्थाने त्यांच्या जिवितास धोका निर्माण होईल ही जी भूमिका घेतली आहे व त्यांच्या वकिलाने युक्तिवाद केला आहे त्यावर माहिती देणे रोखता येईल किंवा कसे.

माहिती दिल्याने त्रयस्थाच्या शारीरिक सुरक्षतेस धोका उत्पन्न होऊ शकतो अशा फक्त शंकेवर (Apprehension) माहिती देणे रोखून धरता येत नाही असे आयोगाचे मत आहे. अतः कलम ८ (१) (छ) येथे लागू होत नाही.

७) वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, मूळ अपिलार्थिने मागितलेल्या माहिती अर्जातील काही मुद्दे वगळता इतर मुद्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) मधील तरतुदी लागू होत नाहीत. त्याचप्रमाणे केवळ शंका ही माहिती न देण्यास पुरेशी ठरु शकणार नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती ज्या स्वरूपात उपलब्ध आहे त्या स्वरूपात ती देणे आवश्यक आहे. माहिती तयार करुन देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अर्जदाराने विचारलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना शाखा कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना मूळ अर्जदारास द्यावी लागेल व तसेच जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत स्पष्टपणे मूळ अर्जदारास कळवावे लागेल.

८) मूळ अपिलार्थी श्री. गजानन देशमुख यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास विनंती केली की, त्यांनी दिनांक २२-०९-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी वर परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या माहितीच्या छांयाकीत प्रती त्यांना देण्यात याव्यात. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या दोन मुद्यांची (मूळ माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५) माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना शाखा कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती (मूळ अर्जदार) श्री. गजानन देशमुख यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन, जिल्हा जालना.

२. श्री. विकास रामचंद्र शिंदे, सारा वैभव रो.क्र.डी/३,जटवाडा रोड, हर्सूल परिसर, औरंगाबाद

३. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना शाखा कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.राजु सुर्यभान हिवराळे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.राजु सुर्यभान हिवराळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२००९ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. १९.०४.२०११ व ०१.०७.२०११ रोजी झाली होती. दोनही सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. प्रकरणाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तदनंतर आज दि.०३.०२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, दि. १९.०९.२००८ रोजी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना मिळाली आहे. तथापि खालील माहिती मिळाली नाही.

"श्री. मो.मुनीर अब्दुल रज्जाक यांना दिल्या गेलेल्या किरकोळ रॉकेल विक्री परवान्यासाठी त्यांनी दाखल केलेल्या प्रस्तावासोबतच्या कागदपत्रांच्या प्रती."

अपिलार्थी यांना वरील कागदपत्रांपैकी त्रयस्थासंदर्भातील वैयक्तिक माहिती वगळून सार्वजनिक स्वरुपाची माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांना वरील माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजु सुर्यभान हिवराळे, रा.जयभिमनगर,टाऊन हॉल सेंटर,गुलाबवाडी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देशपांडे मोहनराव दत्तात्रय, : अपिलार्थी
गुरुकृपा निवास, दत्त मंदिर, समता नगर, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
लेखापाल, लेखा विभाग, नगरपरिषद, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देशपांडे मोहनराव दत्तात्रय | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखापाल, लेखा विभाग, नगरपरिषद, उस्मानाबाद<br>- श्री. पी. डी. दळवी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये नोव्हेंबर २००९, डिसेंबर २००९ व जानेवारी २०१०, फेब्रुवारी २०१० या चार महिन्याच्या कालावधीची नगर परिषद फंडातून कंत्राटदाराला दिलेल्या रक्कमेबाबतची तपशीलवार माहिती मागितली आहे. तसेच नगर परिषद निवृत्त कर्मचा-यांची यादी मागितली आहे.

अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे असे त्यांनी युक्तिवादात मान्य केलेले आहे. त्यांना १०७ पृष्ठांची माहिती मिळाली आहे. त्यामध्ये उपरोक्त कालावधीत नगर परिषदेतर्फे एकूण झालेल्या सर्व पेमेंटचा तपशील देण्यात आलेला आहे. त्यांना फक्त गुत्तेदाराचा तपशील आवश्यक आहे. यावर विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अशी स्वतंत्र माहिती ठेवण्यात आलेली नाही. ही बाब श्री. देशमुख, मुख्यधिकारी, नगरपरिषद यांना व्यक्तिशः पहावी लागेल व माहिती ठेवली असल्यास त्याच्या प्रती विनामूल्य नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठवाव्या लागतील व माहिती ठेवली नसल्यास तसे एका महिन्याच्या आत अपिलार्थीस कळवावे लागेल. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील तरतुदीनुसार ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती देय होते. संस्करण करुन माहिती देता येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशपांडे मोहनराव दत्तात्रय, गुरुकृपा निवास, दत्त मंदिर, समता नगर, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, लेखा विभाग, नगरपरिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. ननवरे पी. एस.,<br>व्दारा गायकवाडी एस. एम.,<br>योगेश निवास, बी. फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पवार बी. एस.<br>अधीक्षक वर्ग-२ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यानी हीच माहिती दिनांक १४-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये मुख्याध्यापक, श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे मागितलेली आहे व त्यावर आयोगाने दिनांक १८-०१-२०१२ रोजी निर्णय दिलेला आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती व त्यांनी दिनांक १४-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये मुख्याध्यापक, श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडून मागितलेली माहिती समान आहे व माहितीचा कालावधी २००२ ते २०१० असा समान आहे. दोनही माहितीचे अर्ज एकच असल्याकारणाने व माहिती एकाच शाळेची असल्याकारणाने आणि यापूर्वीच्या दिनांक १४-०१-२०१० च्या माहिती अर्जावर दिनांक १८-०१-२०१२ रोजी व्दितीय अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला असल्याकारणाने आज रोजी विचाराधीन दिनांक ०४-०५-२०१० च्या व्दितीय अपिलावर सुनावणीची घेण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ननवरे पी. एस., व्दारा गायकवाडी एस. एम., योगेश निवास, बी. फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक विठ्ठल माळी, : अपिलार्थी
आनंदनगर, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पर्यवेक्षक, पाणीपुरवठा, नगरपरिषद, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अशोक विठ्ठल माळी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, पाणीपुरवठा, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की,त्यांना माहिती मिळालेली नाही, तसेच त्यांच्या दिनांक १९-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक विठ्ठल माळी, आनंदनगर, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, पाणीपुरवठा, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंत गोविंदराव गव्हाळे, : अपिलार्थी
१०-१४, सुभाषिणी निवास, बालाघाट कॉर्नर, नागनाथ रोड,
उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष, नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. -०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी, नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद यांच्याकडे एकूण तीन मुद्दयांवर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी प्रथम अपील जुलै २०१० मध्ये अध्यक्ष, नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद यांच्याकडे केलेले दिसून येत आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या जुलै २०१० च्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद यांच्याकडे असण्याची शक्यता आहे. या प्रकरणी आयोग सहायक संचालक, ग्रंथालय, औरंगाबाद यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करत आहे. प्रकरण सहायक संचालक, ग्रंथालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथम सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, ग्रंथालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या जुलै २०१० च्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव गव्हाळे, १०-१४, सुभाषिणी निवास, बालाघाट कॉर्नर, नागनाथ रोड, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नगर वाचनालय, धाराशीव, मेन रोड,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, ग्रंथालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जहागीरदार अफसर स. मझर, : अपिलार्थी
जामा मस्जीदसमोर, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद - श्री. आर. ए. जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०३-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०३-०५-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये नळदुर्ग शहरात किती स्वस्त धान्य दुकानदार आहेत, प्रत्येक दुकानदाराकडे किती कार्ड आहेत, मागील तीन महिन्यापासून रेशनवर मिळणा-या वस्तुंची यादी, पिवळ्या, केशरी, बीपीएल कार्डावर किती माल मिळतो त्याचा भाव, रॉकेल ठोक व किरकोळ विक्रेत्यांची यादी, रॉकेलचा दर इत्यादी विस्तृत अशी माहिती मागितलेली आहे माहितीच्या अर्जामध्ये माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही. तथापि एक मुद्दयामध्ये मागील तीन महिन्यापासूनची माहिती असा उल्लेख आहे. यावरुन त्यांना डिसेंबर २००९, जानेवारी व फेब्रुवारी २०१० या तीन महिन्याची माहिती अपेक्षित आहे असे दिसून येते. अपिलार्थी यांच्या या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०३-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देऊन रुपये २४ इतकी शुल्काची रक्कम प्रतिपृष्ठ दोन याप्रमाणे १२ पृष्ठांकरिता भरणा करावी म्हणजे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देता येईल असे कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करण्यास प्रतिसाद दिलेला नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जहागीरदार अफसर स. मझर, जामा मस्जीदसमोर, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अमरराजे कदम परमेश्वर, | : | अपिलार्थी |
| रा. परमेश्वर वाडा, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद - श्री. एम. जी. देशपांडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद - श्री. एम. एम. पाटील | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३१-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २५-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये सहा मुद्दयावर बावी, तालुका उस्मानाबाद येथे नाबार्ड योजनेतून झालेल्या रस्त्याच्या कामाबाबतची माहिती मागितली आहे. सदरचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक ०४-०३-२०१० रोजी प्राप्त झाला आहे. त्यांनी सदरची माहिती देण्याकरिता रुपये ९७ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे दिनांक २९-०३-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १३-०५-२०१० रोजी सुनावणी घेतली आणि सुनावणीच्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त झाल्याची पोच दिली आहे व ती जन माहिती अधिकारी यांच्या दप्तर दाखल आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे दिनांक ०२-०८-२०१० चे व्दितीय अपील आयोगापुढे आहे. त्यांना माहिती मिळाली आहे तथापि त्यांना अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे असे त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे नेमके नमूद केलेले नाही. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे पाहता अपिलार्थीस दिनांक २९-०३-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत शुल्काचा भरणा करावा असे कळविल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर, रा. परमेश्वर वाडा, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, : अपिलार्थी
यशवंतनगर, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा विकास नागरी यंत्रणा,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश सुदामराव गायकवाड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद - श्री. उ. स. कुर्वलकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले. तसेच त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे तथापि ती चुकीची व दिशाभूल करणारी मिळाली आहे असे त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे. ही बाब विचारात घेता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, यशवंतनगर, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमनाथ दादाराव डाके, : अपिलार्थी
घर नं. १/१८३, तांबेरी विभाग, भन्साळीच्या पाठीमागे, जुना गैस गोडाऊन जवळ, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विधी अधिकारी, म. रा. म. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ०८

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य विधी अधिकारी, विधी शाखा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ०८

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६६

२ सुनावणीची तारीख दि. १४-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. सोमनाथ दादाराव डाके : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
विधी अधिकारी, म. रा. म. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ०८ - श्री. एस. डी. दाते

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
मुख्य विधी अधिकारी, विधी शाखा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ०८

३.४ जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आनंद व्ही. गाडे, सहा. कर्मचारी वर्ग अधिकारी : उपस्थित

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २०-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १५-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १७-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या व्यक्तिगत जन्मतारखेबाबत माहिती मागितली आहे. त्याकरिता ४२ रुपये भरणा करावा असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थीकडून शुल्काचा भरणा करण्यात आल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली आहे. त्यानंतरही पुन्हा अपिलार्थीस दिनांक ०६-०२-२०१२ रोजी माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. प्रसंगवशात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी त्यांच्या विभागातच कार्यरत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता सदरचे प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमनाथ दादाराव डाके, घर नं. १/१८३, तांबेरी विभाग, भन्साळीच्या पाठीमागे, जुना गैस गोडाऊन जवळ, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, म. रा. म. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ०८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य विधी अधिकारी, विधी शाखा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ०८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष प्रकाश काळे, : अपिलार्थी
भवानी रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे चिवरी,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे चिवरी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. एल. ई. सुरवसे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - श्री. मेटे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. निरंक |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २०१० अशी चार वर्षाच्या कालावधीतील ग्रामपंचायत अंतर्गत विविध योजनांची नऊ मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. त्यानंतर दिनांक २४-०८-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. याबाबतची पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष प्रकाश काळे, भवानी रोड, दिपक चौक, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे चिवरी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कल्याण माणिकराव शिंगाडे,<br>रा. पोलीस लाईन, घर नंबर १००/५, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, (पोलीस मुख्यालय), उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कल्याण माणिकराव शिंगाडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, (पोलीस मुख्यालय), उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पी. एस. गिरी, पोलीस निरीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०५-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या दहा मुद्दयांवरील माहितीपैकी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०५-२०१० व १५-०७-२०१० रोजी आणि उर्वरीत माहितीचा शोध घेऊन अपिलार्थीस दिनांक १७-०१-२०१२ रोजी माहिती देण्यात आल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना माहिती मिळाली आहे तथापि त्यांना खालील माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे.

१. पोलीस अधीक्षक कार्यालयाने पोलीस महानिरीक्षक कार्यालयाकडे पाठविलेला मानीव तारीख प्रस्ताव त्यावर तो त्रुटींची पुर्तता करण्यासाठी परत पाठविला आहे त्याची प्रत मिळाली नाही.

२. सन २००७ मध्ये पोलीस कॉन्स्टेबल ते पोलीस नाईक पदोन्नती झाली त्यावेळी पदोन्नती-करिता तयार करण्यात आलेल्या टिपणीची प्रत मिळाली नाही.

३. अपिलार्थी यांच्या स्वतःच्या सेवापुस्तकाची प्रत मिळाली नाही. संपूर्ण सेवापट देण्यात यावा.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. या माहितीसाठी पोलीस अधीक्षक यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील दोन कर्मचा-यांचा एक गट तयार करुन या माहितीचा शोध घेण्यात यावा आणि अपिलार्थीस माहिती पुरविण्यात यावी. माहिती उपलब्ध झाली नाही तर इतर कोणत्या कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकते त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिका-याचा तपशील अपिलार्थीस कळविण्यात यावा. अपिलार्थी यांनी त्यांच्या स्वतःच्या सेवापुस्तकाची प्रत मागितली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस त्यांच्या स्वतःच्या संपूर्ण सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कारवाई योजून जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती पाठवतील, ही बाब पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याण माणिकराव शिंगाडे, रा. पोलीस लाईन, घर नंबर १००/५, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, (पोलीस मुख्यालय), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोरे प्रदिप धनराज, : अपिलार्थी
रा. चिंचाली रेबे,ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोरे प्रदिप धनराज | : | उपस्थित |
| ३.२ | सध्याचे जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत, चिंचोली (रेबे), ता.लोहारा, जि.उस्मानाबाद - श्री. ओ.एम.बिराजदार | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. मातोळे एस.एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद - श्री. वैरागे आर.ए. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१.०८.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगासमोर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मौ. चिंचोली रेबे, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद येथील सन २००२ ते २००९ पर्यंतच्या एकूण सात वर्षे कालावधीमध्ये झालेल्या ग्रामसभा व मंजूर झालेले ठराव व मंजूर झालेल्या कामाची माहिती, ग्रामसभेत घरे मिळालेल्या लोकांची यादी, ग्रामसभेस उपस्थित नागरिकांची माहिती-यादी, दारिद्रयरेषेखालील लोकांची यादी, घरांसाठी अर्ज दाखल केलेल्या व्यक्तींची यादी -अशी विस्तृत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती मोठया कालावधीची असल्याकारणाने संकलीत करुन दि. १३.०५.२०१० रोजी देण्यात आली आहे, असे कथन केले. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही, असे युक्तिवादात सांगितले. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा संच उपलब्ध आहे. तो आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आला. अपिलार्थी यांनी तो स्वीकारला.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोरे प्रदिप धनराज,रा. चिंचाली रेबे,ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, चिंचोली (रेबे), ता.लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.		जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. धर्मराज तानाजी सावंत, : अपिलार्थी
रा.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, मौ. हंगरगा (तूळ),
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, मौ. हंगरगा (तूळ),ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद - श्री. केशव प्रल्हादराव लोखंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००७-२०१० अशा एकूण चार वर्षांच्या कालावधीची मौ.हंगरगा ग्रामपंचायतीअंतर्गत झालेल्या विकास कामाबाबत विविध बाबींवर एकूण २१ मुद्यांच्या प्रती मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी ग्रामसेवक आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मोठया कालावधीची विस्तृत स्वरुपातील आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.अपिलार्थी यांनी नेमकी माहिती मागणे अभिप्रेत आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाचा प्रभावीपणे अंमल होईल. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती संकलीत करुन दि. ०९.०२.२०११ रोजी पोस्टाद्वारे पाठविलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना माहितीच्या व्याप्तीचा व मागितलेल्या माहितीची उपयुक्तता तसेच जनहिताचा व्यापक दृष्टीकोन या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे, तसे केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. भविष्यात याबाबत दक्ष राहावे.

या सर्व बाबी पाहता विचाराधीन अपील आयोगाचे स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. धर्माजी तानाजी सावंत, घाटशिळ रोड, दिपक चौक, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, मौ. हंगरगा (तूळ), ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी
रा.आराधवाडी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,
मौ. वाणेवाडी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,तुळजापूर, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ३१.०५.२०१० रोजीच्या माहिती अर्जाद्वारे सन २००० ते २०१० या कालावधीची एकूण १५ मुद्यांवर मौ. वाणेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत - इंदिरा आवास घरकुल योजना, हागणदारी मुक्त योजना, किर्दी नोंद रजिस्टर, माहिती अर्ज, १२ वा वित्त आयोग, विशेष घटक योजना, मानवी विकास योजना, यशवंत ग्राम योजना व जवाहर योजना, रोजगार हमी योजना, तिर्थ क्षेत्र विकास कार्यक्रम इ. -अशी मोठया व्याप्तीची माहिती मागितली होती. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी दि. २४.०६.२०१० रोजी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी स्वेच्छेने त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यासाठी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी त्यांना आवश्यक असलेल्या नेमक्या १-२ मुद्यांबाबत जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांत कळवावे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाणेवाडी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करुन नेमके मुद्दे कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,मौ. वाणेवाडी, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, तुळजापुर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास पांडुरंगराव वडगावकर,रा.उस्मानाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद : उत्तरवादी

जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे एम.डी. वरिष्ठ सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. वाघमारे एस.बी., शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११.०९.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे द्वितीय अपिलावरुन असे दिसून येत आहे की, प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर राहिले नव्हते म्हणून अपिलार्थीस माहितीची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढून प्रथम अपील खारीज केले आहे. ही बाब विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊन पुन्हा सुनावणी घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्देनिहाय निर्णय पारीत करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १६.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास पांडुरंग वडगावकर," दे व घर", आदर्शनगर,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. इकबाल सईद काझी, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. इकबाल सईद काझी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद - श्री. एम.एम.पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद - श्री. एस.जी.देशपांडे | : | उपस्थित |
| | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००९-२०१० या कालावधीमध्ये घेतलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय आय.टी.आय. उस्मानाबाद येथील प्रयोगशाळा/कार्यशाळा बांधकामाविषयी माहिती मागितली आहे. त्यामध्ये - कामाची अंदाजपत्रके, प्रस्तावित किंमत, कामाचा निर्धारित कालावधी, काम करणारी व्यक्ती/संस्था, आतापर्यंत झालेला एकूण खर्च, कामाचा दर्जा, हाती उरलेले काम, काम पूर्ण होण्यास लागणारा एकूण कालावधी - या मुद्यांचा समावेश आहे. त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात आयोगास कथन केले की, माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दि. २५.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली होती. ती माहिती त्यांना विनातामिली परत प्राप्त झाली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १४.०६.२०१० रोजी ठेवलेल्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. तदनंतर अपिलार्थीस दि. २३.०७.२०१० रोजी पुनश्च् माहिती पाठविली आहे.

त्यामध्ये खालील माहिती अपिलार्थीस मिळाली नाही.

१) कंत्राटदाराचा तपशील.

२) काम पुर्ण करण्याचा निर्धारीत कालावधी

३) कामावर झालेला खर्च अत: अंतिम देयकाची प्रत.

४) कंत्राटदारास दिलेल्या वर्कऑर्डरची प्रत.

वरील माहिती तसेच कंत्राटदारास वरील कालावधीमध्ये काम पूर्ण न झाल्यास, त्यामध्ये मुदतवाढ दिली असल्यास त्याची प्रत देण्यात यावी अथवा मुदतवाढ दिली नसल्यास केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. इकबाल सईद काझी, काझी गल्ली, नगर परिषद शाळेजवळ, दर्गारोड, उस्मानाबाद - ४१३५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माळकुंजे रेवणसिध्द शंकरराव, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
म.रा.वि.वि.मर्यादित, संवसु मंडळ कार्यालय,उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता (महावितरण),
म.रा.वि.वि.मर्यादित, संवसु मंडळ कार्यालय,उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माळकुंजे रेवणसिध्द शंकरराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता (महावितरण), संवसु मंडळ कार्यालय, उस्मानाबाद - श्री. जी.एन.जोंधळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, (महावितरण), संवसु मंडळ कार्यालय,उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांना माहिती मिळालेली आहे. तथापि त्यांना देण्यात आलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, अशी अपिलार्थी यांची धारणा आहे. याकरिता अपिलार्थी यांचा मूळ अर्ज,त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आलेली माहिती या बाबींची पाहणी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, (महावितरण), संवसु मंडळ कार्यालय, उस्मानाबाद यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने करावी व अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे आढळल्यास उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य तीस दिवसांच्या आत देतील, असे पहावे. अपिलार्थी यांना त्यांच्या अर्जातील प्रश्नार्थक, खुलासेवजा वगळून देय होणारी माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (महावितरण), संवसु मंडळ कार्यालय,उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भातील कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माळकुंजे रेवणसिध्द शंकरराव, लिंबोणीबाग, शिवानीनगर, तांबरी विभाग, गणपती मंदीराजवळ, उस्मानाबाद - ४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (महावितरण), संवसु मंडळ कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, (महावितरण), संवसु मंडळ कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दासराव ज्ञानोबा खरसडे,<br>मु.पो.तांदुळवाडी, ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कनिष्ठ अभियंता,म.रा.वि.वि.कं.लि.,उपशाखा शेळगाव,<br>ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं.लि.,शाखा परंडा,<br>ता.परंडा, जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि. कं.लि.उपशाखा शेळगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. तासगावकर इम्रान दिलीप | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक अभियंता, म.रा.वि.वि. कं.लि.,शाखा परंडा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. बागुल विलास शामलाल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०/०६/२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. --/०७/२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी दोघेही नवीन आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.परंडा, जि.उस्मानाबाद यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परंडा, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दासराव ज्ञानोबा खरसडे,मु.पो.तांदुळवाडी, ता. परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि. कं.लि.उपशाखा शेळगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता, म.रा.वि.वि. कं.लि.शाखा,परंडा, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश ऊर्फ सुर्यकांत चंद्रकांत कांबळे, : अपिलार्थी
रा.वरुड, पो.उळुप, ता.भूम, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार : उत्तरवादी
(महसूल),तहसील कार्यालय,भूम, जि.उस्मानाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार
(पुरवठा),तहसील कार्यालय,भूम, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,भूम, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. प्रशांत नानासाहेब पंडित | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी -१ - नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, भूम, जि.उस्मानाबाद - श्री. घोळवे सुरेश प्रल्हादराव | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी -२ - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भूम, जि.उस्मानाबाद - श्री. ठकार चिंतामण बाळकृष्णराव | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी -१ तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, भूम, जि.उस्मानाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी भूम, जि.उस्मानाबाद तहसील कार्यालयाची विविध विषयाची व्यापक स्वरुपाची माहिती एकूण ८ मुद्यांवर दि. ०१.०४.२००५ ते ३१.०३.२०१० या कालावधीची मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विविध शाखेत उपलब्ध असते. ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. जन माहिती अधिकारी यांनी या माहितीच्या संदर्भात दि. ०६.०७.२०१० रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे व तात्काळ उपलब्ध होणाऱ्या माहितीकरिता ₹५६/- चा भरणा करावा असे कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीत एकंदर त्यांच्याकडे तहसीलदार पदासह इतर चार पदांचे कार्यभार होते, असे आयोगासमोर कथन केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. उर्वरित माहिती स्वस्तधान्य दुकानदारांकडे होती, ती द्यावयाची बाकी आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांनी ₹५६/- इतक्या शुल्काचा भरणा केलेला आहे. तथापि त्यांना माहिती मिळालेली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या एकूण १५८९ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. याकरिता ₹२/- प्रमाणे ₹३१७८/- इतके शुल्क होत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता अधिनियमातील कलम ७(९) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस व्यक्तिशः पाहणी देण्यात यावी व अशी पाहणी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस अनुज्ञेय नसेल, या बाबीची नोंद अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी माहितीपोटी भरलेले शुल्क ₹५६/- त्यांना परत करावे, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,भूम, जि.उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून

अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,भूम, जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क ₹५६/- त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत परत करावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यकांत चंद्रकांत कांबळे, जय हनुमान, मु.वरुड, पो.उळूप,ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१),तहसील कार्यालय, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लिमकर बलभीम सुखदेव, : अपिलार्थी
रा.खासगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,
खासगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खासगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद- श्री. कांबळे गुणवंत हनुमंतराव | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. यादव किरण केशव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद - श्री. इंगळे पांडुरंग संतोषकुमार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९.०९.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यास कार्यालयीन कामकाजाच्या व्यापामुळे काही कालवधी लागला. सदरची माहिती एकत्रित करुन अपिलार्थी देण्यात आली आहे. त्यासंदर्भातील पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास दि. २०.०१.२०१२ रोजी दिलेल्या पत्रामध्ये त्यांना माहिती मिळाल्याची नोंद आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लिमकर बलभीम सुखदेव,मु. पो. खासगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खासगाव, ता.परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती कार्यालय,परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दत्तात्रय शरणय्या स्वामी,<br>रा.लोहारा (बु.), जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>लोहारा (बु.), ता. लोहारा, जि.उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी (सा.),<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१४७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,लोहारा, जि. उस्मानाबाद- श्री. जाधव दिनकर प्रभाकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद - श्री. मनोज चंद्रकांत जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या माहितीच्या अर्जावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी एकूण ६ मुद्यांवर प्रशासकीय कार्यवाहीबाबतची माहिती मागितलेली आहे. त्यातील मुद्दा क्र. ५ वगळता इतर माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली आहे. अधिनियमातील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे त्यासंदर्भातील माहिती देय होत नाही. तथापि देय होत असलेली मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांना सदरची माहिती मिळाली असून त्यांची काहीही तक्रार नाही, अशी पोच त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद यांना दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वामी दत्तात्रय शरणय्या, मु.पो.लोहारा (बु.),ता.लोहारा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, लोहारा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती शोभा मनोहरराव गोमार (दुड्डे),<br>मंगेश सदन, नारायण नगर, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर अभियंता, नगर परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर अभियंता, लातूर महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ३३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. देशमुख एन. एम., शा. अ. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०१-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २५-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दिनांक ३१-०८-२०१० च्या माहिती अर्जान्वये नवयुग थियटरजवळील कमर्शियल व्यापारी संकुल व पार्कीग साईट क्रमांक ८२ वरील पहिला मजला संकुल बी. ओ. टी. या धर्तीवर बांधण्यासाठीच्या मूळ संचिकेची प्रत, नकाशा प्रत, तांत्रिक मान्यता प्रत इत्यादी माहिती मागितली आहे. सदर माहिती त्या प्रत्यक्ष घेणार होत्या. अपिलार्थी त्यावेळी नगरसेवक असल्यामुळे त्यांनी कार्यालयात असलेल्या माहितीची पाहणी केली आहे, तसेच दिनांक १०-१२-२०१० रोजी अपिलार्थी यांनी माहिती स्विकारली आहे. त्याची पोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे. त्यामध्ये अपिलार्थी यांनी अर्धवट व अपूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमामध्ये प्राप्त होणा-या अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) व १९ (१) नुसार विहित मुदतीत कारवाई करण्याची दक्षता भविष्यात घ्यावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती शोभा मनोहरराव गोमार (दुड्डे), मंगेश सदन, नारायण नगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, लातूर महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय मुरलीधरराव मान्नीकर, : अपिलार्थी
रा.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी, :
नगर परिषद,उदगीर, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३१७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अंतर्गत लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर- श्री. व्ही. के. आंबेसंगे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर- श्री.एस.टी.चव्हाण | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०२.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०६.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची

पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी पाच मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. माहितीचा कालावधी सन २००१ ते २०१० असा ११ वर्षांचा आहे. माहिती उदगीर शहरातील सडकांचे सिमेंटीकरण व डांबरीकरण झालेल्या रस्त्याबाबतची आहे. माहितीची व्याप्ती जास्त असल्यामुळे व माहिती तीन विभागातील कर्मचाऱ्यांकडे विखुरलेली असल्यामुळे संकलीत करण्यास कालावधी लागला. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जी माहिती देय आहे ती दि. ३०.०८.२०११ रोजी विनामूल्य व्यक्तिशः देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज दि. ०३.०२.२०११ रोजीचा आहे. तदनंतर त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी असेही दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही, त्याचप्रमाणे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार विहित मुदतीत सुनावणी घेतलेली नाही. भविष्यात याबाबत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दक्ष राहावे.

या पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपिलासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत निर्णय घेण्याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय मुरलीधराव मान्नीकर,रा.नवी आबादी, कोर्टाच्या मागे,उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा अंतर्गत लेखा परीक्षक, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पंढरीनाथ गंगाराम पेद्दयावाड,<br>मु. पो. नळगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०३८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पंढरीनाथ गंगाराम पेद्दयावाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद<br>- श्री. विष्णु कांबळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. वाघमारे एस. बी., शिक्षण विस्तार अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०२-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २३-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले होते की, पूर्वी ते हैद्राबाद राज्यात बिदर विभागात शिक्षक म्हणून काम करत होते. त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी त्यांची सेवाविषयक माहिती एकूण ११ मुद्दयांव्दारे मागितली आहे. जेणेकरुन त्यांना पेन्शन प्राप्त होऊ शकेल.

सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी हे सुमारे ८० वर्षे वयाचे जेष्ठ नागरिक, सेवानिवृत्त शिक्षक आहेत. याकरिता त्यांनी मागितलेली माहिती कशी उपलब्ध होऊ शकेल, याबाबत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने पुढील सुनावणीस विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग लातूर यांना विशेष साक्षीसाठी पाचारण करण्यात यावे असे आयोगातर्फे निर्देश देण्यात येऊन, त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. अपिलार्थी हे जेष्ठ नागरिक आहेत. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या छांयाकित प्रती आयोगातर्फे काढून अपिलार्थीस देण्यात आल्या. अपिलार्थीने त्या स्विकारल्या. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, त्यांना देण्यात आलेली माहिती याची विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी स्वतः पाहणी करावी. माहिती अपूर्ण दिली असल्यास जन माहिती अधिकारी उर्वरित माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवतील व उपलब्ध होत नसल्यास तसे अपिलार्थीस कळवतील तसेच या माहितीसंदर्भात काही अडचणी असल्यास त्याबाबतही अपिलार्थीस कळवतील, याची खातरजमा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी व्याक्तिशः करावी याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) नुसार त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना राज्य माहिती आयोगास त्यांचा अहवाल सादर करावा लागेल.

अपिलार्थी जेष्ठ नागरिक आहेत. आयोगासमोर दोन वेळेस सुनावणीस ते उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कुठलाच प्रतिसाद दिलेला नाही, याकरिता अपिलार्थी यांना आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी येण्याजाण्याकरिता झालेला खर्च नुकसानभरपाई म्हणून देण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (b) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना निर्देश देण्यात येत आहेत. अपिलार्थीस देय होत असलेली नुकसानभरपाई रुपये ३००० /- इतकी आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेली माहिती याची पहाणी करून माहिती अपूर्ण असल्यास जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद हे अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत उर्वरित माहिती विनामूल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवतील व माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपिलार्थीस कळवतील,ही बाब विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी व्यक्तिशः पहावी.याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) नुसार त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस रुपये ३००० /- इतकी नुकसानभरपाई अदा करण्याची कार्यवाही एका महिन्यात करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ गंगाराम पेद्दयावाड, मु. पो. नळगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमाकांत प्रभाकर मोठे, : अपिलार्थी
रा. शिवनखेड (बु.), ता.चाकूर,
जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०२.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०६.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा

निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील अपिलार्थीने सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याचे मोघमपणे नमूद केले आहे. यासाठी अपिलार्थी यांनी पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना नेमके अपूर्ण मुद्दे कळवावेत. तदनंतर पुढील पंधरा दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती अपिलार्थीस पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमाकांत प्रभाकर मोठे, रा.शिवणखेड (बु.),ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप नागनाथ चौकटे,श्री. नरसिंग किशनराव कोयाडे, : अपिलार्थी
श्री. शंकर महादेव मंगे, रा.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी संचालक,
लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
मुख्य कार्यालय, लातूर.
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | कार्यकारी संचालक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुख्य कार्यालय, लातूर यांच्यातर्फे ॲड. अमीत देशपांडे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०३.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी श्री. प्रदिप चौकटे व श्री. शंकर मंगे व लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे वकील ॲड.ए.एस.देशपांडे उपस्थित होते. बँकेचे वकील ॲड. देशपांडे यांनी आयोगास विनंती केल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तदनंतर आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि.लातूर यांचे वकील ॲड.अमित देशपांडे यांनी आयोगासमोर कथन केले की, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लि.लातूर या बँकेस कोणतेही शासकीय अनुदान प्राप्त होत नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही. सहकारी संस्थांसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय, सहकारी संस्था अधिनियम १९६० तसेच माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(९) नुसार अपिलार्थीस माहिती देय होते किंवा कसे ही पाहणे या प्रकरणी आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. यासाठी जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त बाबींचा सर्वंकष विचार करुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन यथोचित निर्णय पारीत करावा, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप नागनाथ चौकटे,श्री. नरसिंग किशनराव कोयाडे, श्री. शंकर महादेव मंगे

रा.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,मुख्य कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता,
पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली - श्री. दोडे एस.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली -श्री. एन.जी.उपवार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली - श्री. मो. जमिल उस्मानभाई | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.११.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०४.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे पूर्णा प्रकल्पातील विविध कामाच्या संदर्भात सन २००५ ते २०१० या पाच वर्षांच्या कालावधीच्या एकूण ६ मुद्यांद्वारे माहितीच्या छायाप्रती मागितल्या आहेत. ही माहिती त्यांना मिळाली नाही. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर सुनावणी घेण्यात आली, त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. या सुनावणीच्या वेळी निर्णय देण्यात आला की, सन २००५-०६ ते २००६-०७ या कालावधीतील माहिती चौकशी प्रकरण प्रलंबित असल्यामुळे त्यासंदर्भातील माहिती देता येत नाही. उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यात यावी. तथापि अपिलार्थी यांना ही माहिती मिळाली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कथन केले की, पोलीस गुप्त चौकशी असेल तरच माहिती देण्यात येत नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली यांनी आयोगासमोर कथन केले की, माहितीचा अर्ज दिनांक. ११.१०.२०१० रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीस माहिती संकलीत करुन एकत्रित एकूण १२३१७ पृष्ठे होतात त्याप्रमाणे प्रतिपृष्ठ ₹२/- प्रमाणे ₹ २४६३४/-शुल्क भरण्यात यावे, असे दि. ०३.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये लेखाशीर्षासह कळविण्यात आले. तथापि हे पत्र नजरचुकीने चुकीच्या पत्त्यावर पाठविले आहे. ही चूक लक्षात आल्यानंतर दि. १९.११.२०१० रोजी अपिलार्थीस पुन्हा पाठविले. जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०१.२०११ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः विनामूल्य माहिती दिलेली आहे. त्यासंदर्भातील पोचतपशील या पत्राच्या स्थळप्रतीवर असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की,त्यांना दि. ३१.०३.२०११ पर्यंत माहिती मिळाली नव्हती. त्यांना एप्रिल, २०११ मध्ये माहिती मिळाली आहे. तथापि त्यांना सन २००५-०६ ते २००६-०७ या कालावधीशी संबंधित माहिती मिळाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की,अपिलार्थी यांना मागितलेल्या माहिती संदर्भात अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. तथापि पत्र चुकीच्या

पत्त्यावर गेल्यामुळे पुन्हा पाठविणे जरुरीचे झाले. ही चूक कोणत्या अधिकारी/कर्मचाऱ्याकडून घडली याची चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सक्त ताकीद देण्यात यावी. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी तीन वर्षाच्या कालावधीची माहिती त्यांना विनामूल्य देण्यात आली आहे. सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीची माहिती चौकशी प्रकरण प्रलंबित असल्यामुळे देण्यात आली नाही. सदरची चौकशी पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतील.

या पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड अंगद गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप नागनाथराव चौकटे, : अपिलार्थी
रा.अंधोरी, ता.अहमदपूर,
जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय),
पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रदिप नागनाथ चौकटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एस.आर.गोसावी, सहायक पोलीस निरीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०६.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक यांनी सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केल्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थीस दि. १०.०३.२०११ रोजी माहिती दिली आहे. त्यावर अपिलार्थी यांची पोचस्वाक्षरी आहे. दि. १८.०३.२०११ व २२.०३.२०११ रोजीच्या पत्राद्वारे जसजशी माहिती उपलब्ध झाली, त्याप्रमाणे नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना काही माहिती मिळालेली आहे, असे आयोगासमोर कथन केले. तथापि त्यांना खालील माहिती मिळाली नाही असेही प्रतिपादन केले.

१) अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली - त्रयस्थ श्री. रघुनाथ शेळके यांच्या सेवाविषयक तपशीलाची प्रत.

२) वसनगाव येथील नमिता कमलाकर पांचाळ या अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी व काही समाजबांधवांनी मोर्चानंतर दिलेल्या निवेदनाची प्रत.

३) त्रयस्थ श्री. माधव तुकाराम शिंदे यांच्या सेवाविषयक तपशीलाची प्रत.

वरील दोन मुद्यांपैकी शासकीय कामकाजामध्ये निर्माण झालेल्या नोंदीची माहिती अधिनियमातील कलम १० नुसार मुद्दा क्र. १ व ३ मधील त्रयस्थांबाबत सेवापुस्तिकेमधून देय होत आहे. मुद्दा क्र. २ मधील समाजबांधवांनी मोर्चानंतर दिलेल्या निवेदनाची प्रत उपलब्ध असल्यास विनामूल्य देण्यात यावी व नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस तसे कळविण्यात यावे, या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु.),लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याची कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप नागनाथराव चौकटे,रा.अंधोरी, ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय),पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रदिप तु. गंगणे, : अपिलार्थी
नटराज कॉम्प्लेक्स, खांडगांव रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर रचनाकार, नगर परिषद कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर रचनाकार, लातूर महानगरपालिका, लातूर<br>- श्री. शिवणे सतिश कृष्णाराव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०७-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २६-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती

अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ३०-०३-२०१० च्या अर्जान्वये लातूर शहरातील बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांच्यामार्फत बांधण्यात येणा-या अपार्टमेंटबाबतची विविध मुद्दयांवर सन २००५ पासूनची माहिती मागितली आहे. मागितलेली माहिती मोघम स्वरुपात आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास दिनांक ०८-०४-२०१० रोजी प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीस त्याची प्रत प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती चुकीची व अपुरी आहे म्हणून प्रथम अपील दाखल केले आहे. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर त्यांनी दिलेल्या लेखी निवेदनावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे की, अपिलार्थी यांनी कोणती माहिती अपूर्ण व चुकीची आहे त्याचा खुलासा केलेला नाही त्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे.

अपिलार्थी मागील सुनावणीस अनुपस्थित होते. आज त्यांना पुन्हा संधी देण्यात आली होती तथापि आजही ते अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असून ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. तथापि ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व ११ नुसार त्रयस्थांस त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन त्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य ठरत आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक होते. त्यांनी सदर प्रकरणात ही बाब विचारात घेतलेली दिसून येत नाही. याबाबत भविष्यात त्यांनी दक्ष राहावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. या सर्व बाबीचा विचार करता अपील या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०२-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रदिप तु. गंगणे, नटराज कॉम्प्लेक्स, खांडगांव रोड, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, लातूर महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ओमशिवा विश्वनाथ लिगाडे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास मंडळ,
नळेगाव,ता.चाकूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास मंडळ,
नळेगाव,ता.चाकूर, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०१.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०७.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २६.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी

यापैकी कोणीही नव्हते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०८.२०११ रोजीच्या विनंतीअर्जाद्वारे सुनावणीची पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली होती. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तदनंतर आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी आज रोजी देखील अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन व द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना आजपावेतो त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही, असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी दि. २०.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास मंडळ, नळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर या संस्थेकडून संस्थेच्या स्थापनेपासून ते माहिती देईपर्यंत अशा अमर्यादित कालावधीची विविध मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये -२० डिसेंबर, १९९९ रोजी शिवजागृती महाविद्यालयात पार पडलेल्या मुलाखतीमधील सर्व परीक्षकांनी दिलेल्या गुणदान तक्त्याच्या सत्यप्रती, महाविद्यालयातील कर्मचाऱ्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्था व प्राचार्य यांनी विद्यापीठ प्रशासन व विभागीय शिक्षण सहसंचालक यांना केलेला पत्रव्यवहार तसेच विद्यापीठ प्रशासन व विभागीय शिक्षण सहसंचालक यांनी संस्था व प्राचार्य यांना केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, संस्थेच्या सर्व बँकेतील सर्व पासबुकाच्या सुरुवातीपासूनच्या सत्यप्रती, संस्थेचे वर्षनिहाय तपशीलासह ऑडीट रिपोर्ट, संस्थेच्या वर्षनिहाय आवक-जावक रजिस्टरच्या सत्यप्रती, संस्थेने विद्यापीठामध्ये दाखल केलेल्या नवीन महाविद्यालय, नवीन शाखा, इत्यादी सर्व मागणी प्रस्तावासोबत जोडलेल्या संस्थेच्या बॅलन्स सर्टीफिकेटच्या सत्यप्रती., संस्थेला आतापर्यंत प्राप्त देणगीचा तपशील, नाव, पत्ता, निधी, दिनांक, संस्था व धर्मादाय आयुक्त यांच्यात परस्पर झालेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व सत्यप्रती, संस्थेमध्ये आतापर्यंत पास झालेल्या ठरावाच्या सर्व सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश आहे. मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित नसल्यामुळे सुनावणीची पुढील तारीख देऊन बाजू मांडण्यासाठी अपिलार्थी यांना संधी देण्यात आली होती. तथापि अपिलार्थी आज रोजी देखील उपस्थित राहू शकले नाहीत.

अपिलार्थी यांनी संस्था स्थापनेपासून माहिती देईपर्यंतच्या कालावधीच्या मागितलेल्या माहितीचे विविध मुद्दे पाहता व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली नेमकी माहिती जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत मागावी व पुढील पंधरा दिवसांत जन माहिती अधिकारी अपिलार्थी यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन नेमकी मुद्देनिहाय

माहिती अपिलार्थीस विनामूल्य देतील, याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांना पहावे लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने नेमके मुद्दे कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवतील असे पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. ओमशिवा विश्वनाथ लिगाडे, द्वारा श्री. वसंतराव कदम, "मातृवंदन", कोटलवार किराणा दुकानाजवळ, शामनगर, लातूर-४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास मंडळ, नळेगाव,ता.चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय विकास मंडळ,नळेगाव,ता.चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रोडगे प्रभाकर किशनराव, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रोडगे प्रभाकर किशनराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड - श्री. हाशमी सय्यद गौस मोहियोद्दिन | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २६.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थी यांचा जन्म १९४२ चा असून ते ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या स्वतःच्या सेवेबाबतची माहिती मागितली असून ही माहिती सन १९७४-७५ सालची आहे. माहिती जुनी असल्यामुळे देता येऊ शकली नाही. काही माहिती देण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांना माहिती मिळाली नाही, असेही युक्तिवादात आढळले आहे. याकरिता आयोगाने असे निर्देश दिले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्यावर त्यांना देण्यात आलेली माहिती व ज्या दिवशी दिली त्याचा दिनांक व त्याची सद्यपरिस्थिती, याचे एक परिशिष्ट तयार करण्यात यावे व जी माहिती शोधूनही उपलब्ध होऊ शकली नाही त्याबाबत, मुद्देनिहाय दुसरे परिशिष्ट तयार करण्यात यावे व या माहितीशी संबंधित कागदपत्रांच्या प्रती अन्य कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील किंवा कसे, याबाबतही संशोधन करुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती संकलीत करावी. ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.बीड यांनी व्यक्तिशः पहावी व वर नमूद केल्याप्रमाणे या सर्व माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. या निर्देशासह आयोगातर्फे प्रकरणामध्ये सुनावणीची पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज रोजी प्रकरणात पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. मागील सुनावणीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.बीड यांना आयोगापुढे त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात आली होती. तथापि आज रोजी सुनावणीसाठी ते उपस्थित नाहीत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे व प्रकरणात दि. २०.०३.२०१२ रोजी पुढील सुनावणी ठेवण्याचा आयोगातर्फे निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २०.०३.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रोडगे प्रभाकर किशनराव,रा.खाडगाव रोड, साईधाम, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. जनाबाई संजय व्यवहारे (काळे), : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, अणदुर,
ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१०२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी - श्री.रामकुमार रायवाडीकर | : | उपस्थित |
| ३.३ | अपिलार्थी यांचे पती - श्री. संजय गुडांप्पा काळे | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी -ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अणदुर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद-श्री. एम.जे.मेटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०५.२०१० |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६.०८.२०१०

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. २६.०८.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे सुनावणीची पुढील तारीख देण्याचा आयोगातर्फे निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आज रोजी सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. रामकुमार रायवाडीकर व त्यांचे पती श्री. संजय काळे तसेच जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने आयोगास कथन केले की, मौ.अणदूर ग्रामपंचायत येथील मिळकत क्र. २५२ संदर्भात केलेल्या तक्रारीनुसार बोगस-बेकायदा बनावट इसमास दिलेल्या सूचना नोटीशीनुसार ग्रामपंचायत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली आहे. ती अद्यापपावेतो अपिलार्थीस मिळाली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, तुळजापूर यांनी संबंधित प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्याकरिता पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली. त्याप्रमाणे त्यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता एक संधी देण्याचा आयोगातर्फे निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २१.०३.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. जनाबाई संजय व्यवहारे (काळे),द्वारा-" किरण कुंज", हत्तेनगर, रोड क्र.२, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, अणदुर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागरगोजे बळीराम सोपान, : अपिलार्थी
मु. रामवाडी, पो. महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर,<br>जिल्हा लातूर - श्री. काळदाते बिभीषण तुकाराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर,<br>जिल्हा लातूर - श्री. चोले सुभाष रामकिसन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०३-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये चाकूर तालुक्यातील सन २००० ते २००८ या नऊ वर्षाच्या कालावधीच्या कामकाजाबाबतची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यामध्ये कामाचे मंजुरीपत्र किंवा मुल्यांकनपत्र, हजेरीपटाच्या प्रती, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती, कामावर गहु व तांदुळ वाटप केलेल्याच्या काऊंटरच्या प्रती इत्यादीची माहिती मागितली आहे. सदर माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व कालावधी नऊ वर्षाचा असल्यामुळे व अपिलार्थीने माहिती अर्जामध्ये त्यांना कोणत्या योजनेबाबतची माहिती हवी आहे हे नमूद केले नसल्याने त्यांना नेमकी कोणत्या योजनेबाबतची माहिती अपेक्षितआहे अशी विचारणा करणारे पत्र दिनांक ०१-०९-२००९ रोजी देण्यात आले, त्यावर अपिलार्थीने दिनांक ०९-०९-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला, त्यानंतर दिनांक २१-१०-२००९ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी उपविभागीय कृषि अधिकारी, उदगीर यांना अपिलार्थी दारिद्र्यरेषेखाली असल्यामुळे त्यांना विनामूल्य माहिती देण्याकरिता रुपये १८४४० /- चे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे परंतु जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाला अनुदान प्राप्त न झाल्याने दिनांक ३०-०३-२०१० रोजी काही माहिती अपिलार्थीस पोस्टाव्दारे पाठविण्यात आली व उर्वरित माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने सदर माहितीची कार्यालयात येऊन पाहणी करावी, असे कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही व पोस्टाव्दारे पाठविण्यात आलेली माहिती घेण्यास नकार दिला.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. माहितीची व्याप्ती विचारात घेता माहितीची पाहणी करावी असा निर्णय दिनांक ०१-०१-२०१० रोजी घेण्यात आला आहे.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीचा कालावधी, माहितीची व्याप्ती, जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती घेण्यास अपिलार्थीने दिलेला नकार, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याकरिता घेतलेल्या प्रथम अपिलावरील निर्णय या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीस माहितीची पाहणी देणे योग्य ठरत आहे. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही

कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागरगोजे बळीराम सोपान, मु. रामवाडी, पो. महाळंगी, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भानप नवनीत सुमंतराव, : अपिलार्थी
विभागीय वाहतूक अधिकारी, व्दारा विभागीय कार्यालय,
राज्य परिवहन महामंडळ, अंबाजोगाई रोड, लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती
कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ४०० ००८

जन अपिलीय अधिकारी तथा :
महाव्यवस्थापक (क. व. औ. सं.), राज्य परिवहन मध्यवर्ती
कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ४०० ००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१११९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भानप नवनीत सुमंतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती<br>कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ४०० ००८ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक (क. व. औ. सं.), राज्य परिवहन मध्यवर्ती<br>कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ४०० ००८ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-१२-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-१२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आज रोजी सुध्दा अनुपस्थित आहेत. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत आहे त्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.पुढील सुनावणीच्या वेळी सर्व संबधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.पुढील सुनावणी दिनांक २१.३.२०११ रोजी ११.००वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भानप नवनीत सुमंतराव, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, सिंधुदुर्ग विभाग, कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग.

. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.`

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क. व. औ. सं.), राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल,<br>रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, औसा रोड, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/११२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. एस. मुखम, जनसंपर्क अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-११-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुध्दा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांचा दिनांक २८-०८-२०१० रोजीचा माहिती अर्ज दिनांक १८-०९-२०१० रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाला त्याबाबतची माहिती त्यांनी दिनांक २२-१०-२०११ रोजी पत्र क्रमांक ११२०१३ अन्वये अपिलार्थीस दिली आहे त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१०-२०१० रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक २८-१०-२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती व त्याबाबत अपिलार्थीस तारेने कळविण्यात आले होते तथापि अपिलार्थी सदर सुनावणीस गैरहजर राहिले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती द्यावी असा निर्णय देऊन अपील निकाली काढले आहे. सदर निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०३-२०११ रोजी पत्र क्रमांक ५७५४ अन्वये अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्याकरिता त्यांना संधी देण्यात आली होती तथापि आज रोजीही ते अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांची बरीच व्दितीय अपील प्रकरणे राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठापुढे आहेत. परंतु अपिलांच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित राहात नाहीत ही बाब आयोगाच्या नजरेस आली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर देतील याकरिता त्यांना दक्ष राहावे लागेल. माहितीची व्याप्ती, इष्टता इत्यादीचा विचार करुन विहित मुदतीत माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ नुसार प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०२-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
संपादक, विश्व क्षत्रीय राजपूत दर्पन हिंदी मासिक, टेंभुर्णी,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११२९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०८-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०९-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २५-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण

अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २४-०८-२०११ रोजीच्या पत्रान्वये सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती. सदर विनंती मान्य करण्यात येऊन त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी पुन्हा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये शिधापत्रिकेवर होणा-या रॉकेल पुरवठ्यासंदर्भात एकूण तीन मुद्द्यांवर माहिती मागितली आहे. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, संपादक, विश्व क्षत्रीय राजपूत दर्पन हिंदी मासिक, टेंभुर्णी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, संपादक, विश्व क्षत्रीय राजपूत दर्पन हिंदी मासिक, टेंभुर्णी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २३-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण

अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी पुन्हा सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये कोतवाल या पदावर कार्यरत असलेले त्रयस्थ श्री. व्यंकटराव कदम यांची नियुक्ती, वेतनश्रेणी, पदोन्नती इत्यादीबाबतची तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, संपादक, विश्व क्षत्रीय राजपूत दर्पन हिंदी

मासिक, टेंभुर्णी, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब,रा.लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
लातूर विभाग, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
धर्मादाय उपायुक्त,
धर्मादाय उपायुक्त कार्यालय,लातूर विभाग,लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/११५५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,लातूर विभाग, लातूर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - धर्मादाय उपायुक्त, लातूर विभाग, लातूर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.१२.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०७.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी सहायक जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर उपस्थित होते. अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी जन

माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी विचाराधीन प्रकरणासंदर्भातील प्रथम अपील काढून घेतल्याचे जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त, लातूर यांच्याकडे दिलेल्या दि. ०३.०२.२०१२ रोजीच्या पत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. २८.१२.२०१० रोजीचे आहे. तदनंतर त्यांनी विचाराधीन द्वितीय अपिलाशी संबंधित प्रथम अपील मागे घेतले आहे.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे द्वितीय अपील निष्प्रभ होत असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असून आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब,रा.नगर परिषद शाळा क्र. ३२, बरकतनगर,लातूर - ४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी, : अपिलार्थी
रा.निलंगा, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक निबंधक,सहकारी संस्था कार्यालय,
निलंगा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक (प्रशासन),
सहकारी संस्था, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-०२-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहकार अधिकारी श्रेणी -१, सहायक निबंधक,सहकारी संस्था कार्यालय,निलंगा, जि.लातूर- श्री. आर.बी.सगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था, निलंगा, जि. लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे वकील ॲड.अनिल के.महेर (राजपुत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०५.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०५.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०६.०९.२०११ रोजी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी सहायक जन माहिती अधिकारी व वकील ॲड. अनिल के. महेर उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. प्रकरणात आज रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे वकील ॲड. अनिल के. महेर(राजपुत) उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपिलार्थी यांनी यापूर्वी दि. ०७.१०.२०१० रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्याकरिता विनंती अर्ज केला होता त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या वकिलांनी आयोगासमोर कथन केले की, या संदर्भातील माहितीचा एक संच उपलब्ध असून त्यांनी आज सोबत आणलेला आहे. सदर माहितीचा संच आयोगाचे सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरित केला. अपिलार्थीने या माहितीची पाहणी करावी. यामध्ये काही माहिती अपूर्ण आढळल्यास त्यासंदर्भात नेमके मुद्दे पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावेत. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थी यांचा मूळ माहितीअर्ज विचारात घेऊन उर्वरित मुद्देनिहाय माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, श्रेणी-१, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, निलंगा,जि.लातूर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तात्रय गोरोबा कोळी, तेरणा प्रकल्प वसाहत, निलंगा, जि.लातूर - ४१३५२१

२. जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी, श्रेणी-१, कार्यालय सहायक निबंधक, सहकारी संस्था, निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था,निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जावेद अ. सत्तार, : अपिलार्थी
दैनिक औरंगाबाद विश्वमित्र, मानवत तालुका कार्यालय,
तकीय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग, मानवत,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६४३

२ सुनावणीची तारीख दि. १५-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत,
जिल्हा परभणी - श्री. यु. आर. दुधाने

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी
- श्री. जे. एस. सोनवणे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०३-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०५-२०११

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २३-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०८-०८-२०११ रोजीच्या पत्राव्दारे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली होती. त्यांच्या विनंतीनुसार सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मानवत नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्रमांक २३३/१ व २३३/२ मधील त्रयस्थाच्या जमिनीबाबतच्या माहितीच्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. त्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व कलम ११ नुसार दिनांक २५-०४-२०११ रोजी संबंधित त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्यासाठी कळविण्यात आले, तथापि संबंधितांकडून प्रतिसाद मिळाला नाही. अपिलार्थीस माहिती देण्याचा निर्णय घेऊन दिनांक २५-०७-२०११ रोजी नगरपरिषद मानवत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. अपिलार्थीने माहिती स्विकारण्यास नकार दिल्याने पोस्टाचे पाकीट परत आले आहे. त्यानंतर खास दुतामार्फत माहिती पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु ती माहितीही अपिलार्थीने स्विकारली नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ. सत्तार, दैनिक औरंगाबाद विश्वमित्र, मानवत तालुका कार्यालय, तकीय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग, मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जावेद अ. सत्तार, : अपिलार्थी
दैनिक औरंगाबाद विश्वमित्र, मानवत तालुका कार्यालय,
तकीय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग, मानवत,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१६४६

२ सुनावणीची तारीख दि. १५-०२-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत,
जिल्हा परभणी - श्री. यु. आर. दुधाने

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी
- श्री. जे. एस. सोनवणे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०३-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०५-२०११

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०६-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-०८-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०८-०८-२०११ रोजीच्या पत्राव्दारे सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. त्यांच्या विनंतीनुसार सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-०३-२०११ च्या माहिती अर्जान्वये मानवत नगरपरिषद हद्दीमधील सर्वे क्रमांक २४८/१ रचना कॉलनीच्या एन. ए. ची प्रत तसेच संपूर्ण रचना कॉलनीतील प्लॉट प्लॅन नकाशाची सत्यप्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी सन १९९० ते २०१० असा वीस वर्षाचा आहे. अपिलार्थीस ही माहिती दिनांक २०-०७-२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील खास दुतामार्फत पाठविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीने ती स्विकारली नाही. तसेच, दिनांक २५-०७-२०११ रोजी पोस्टाने पाठविण्यात आलेली माहिती अपिलार्थीने घेण्याचे नाकारले आहे, त्यामुळे पाकीट परत आले. या सर्व बाबींवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे व तसेच अपिलार्थीने त्यांना प्रतिसाद न दिल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-०२-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जावेद अ. सत्तार, दैनिक औरंगाबाद विश्वमित्र, मानवत तालुका कार्यालय, तकीय्या मोहल्ला, नेताजी सुभाष विद्यालय मार्ग, मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.